म. ग्रं. सं. ठाणें
विषय — चरित्र
क्र. नं. २४९

# ...ण महाराज केळकर
# ...यांचें चरित्र.

—लेखक—

विद्याभूषण तांबे शास्त्री.

—प्रकाशक—

ग. वि. पटवर्धन,

'बळवंत मुद्रणालय'—रत्नागिरी.

जानेवारी १९२८

RFLBK-00...

...६ आणे.

# श्री सत्पुरुष नारायण महाराज केडगांवकर

# यांचें चरित्र.

नों. नं. १७०८

—लेखक—

**विद्याभूषण तांबे शास्त्री.**

RTLBK-0003598

क्र. ३५८८
इ. नं. ३७६
नं. ७१४१२

—प्रकाशक—

ग. वि. पटवर्धन,

'बळवंत मुद्रणालय'—रत्नागिरी.

जानेवारी १९२८

किंमत ६ आणे.

## आजकालच्या तरुणांना मार्गदर्शक

युगावतार भगवान् श्रीरामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानन्द यांच्या ओजस्वी आणि तेजस्वी धार्मिक वाङ्मयाचा महाराष्ट्रांत प्रसार करणारें एकच मराठी मासिक

# "रामकृष्ण निकेतन."

संपादक—परशुराम सदाशिव देसाई.

या मासिकाच्या ४ थ्या वर्षाचा ४ था अंक नुकताच प्रसिद्ध झाला. महाराष्ट्रांतील सर्व वर्तमानपत्रांनीं व विद्वानांनीं एकवाक्यतेनें या मासिकाची प्रशंसा केली असून विद्यार्थी वर्गाला तर हें फारच उपयुक्त आहे. वा. व. २८. नमुना मागवा आणि वाचून पाहून नंतरच वर्गणीदार व्हा.

व्यवस्थापक "रामकृष्ण निकेतन" रत्नागिरी.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

आमचे विनंतीला मान देऊन सुप्रसिद्ध लेखक व मार्मिक टीकाकार विद्याभूषण तांबे शास्त्री यांनीं श्री नारायण महाराज केडगावकर यांचें त्रोटक चरित्र लिहून दिलें त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होणार आहेत. प्रस्तुत चरित्र त्रोटक असलें तरी महाराजाचे चरित्राचें निवेदन व विवेचन त्यांत मोठ्या कुशलतेनें करण्यांत आलेलें असल्यानें महाराजाचे भक्ताबरोबरच सामान्य वाचकानाही हें चरित्र बोधप्रद वाटेल अशी आशा आहे.

रत्नागिरी
ता. १५।१।२८.

ग. वि. पटवर्धन
प्रकाशक.

# अनुक्रमणिका.


| प्रकरण | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ लें | नवद्वीपाचा प्रवास | १ |
| २ रें | नवद्वीपांत प्रवेश | ३ |
| ३ रें | परिचय | ९ |
| ४ थें | दिशाभूल | १३ |
| ५ वें | चमत्कार | १८ |
| ६ वें | मूळ आणि कूळ | २२ |
| ७ वें | दिनचर्या | ३० |
| ८ वें | शोध आणि बोध | ३४ |
| ९ वें | ब्रह्मापि तं नरं न रंजयति | ३७ |
| १० वें | उपसंहार | ५५ |



श्री नारायण महाराज केडगांवकर

आलें ह्मणजे या ठिकाणाचें बेट हें नाव सार्थ होतें. भूरचनेच्या दृष्टीनें हें ठिकाण पूर्णपणें बेट ह्मणतां येणार नाहीं; पण उपयोगाच्या संबंधानें तें पूर्ण बेट आहे यांत शंका नाहीं. समुद्रांतील बेटें जशीं दर्यावर्दी लोकास विश्रांति घेण्यास अथवा वादळाचे प्रसंगीं प्राणरक्षणास उपयोगी पडतात त्याप्रमाणें संसार–सागरांतील प्रवाशास ह्मणजे आधिव्याधींनीं त्रस्त झालेल्या प्रापंचिक जनास आश्रयार्थ हें स्थान नेहमीं उपयोगी पडतें, ह्मणूनच याला बेट हें नांव अगदीं अन्वर्थक झालें आहे.

असो. स्टेशनपासून सुमारें दोन फर्लांग गेलें कीं, रस्त्याचे उजवे बाजूस मोठ मोठ्या जाहीराती लावलेले फलक दृष्टीस पडतात. हे फलक पाहून येथें चहापान गृहें असावींसें तुह्मास वाटेल पण येथें चहापान गृहें नाहींत हें लक्षात ठेवा. आकाशातील बापाच्या एजंटानीं आपल्या प्रभूचें गुणवर्णन केलेल्या त्या जाहीराती आहेत. पंडिता रमाबाईचें सेवासदन येथेंच असून त्यांत केवळ पोटासाठीं धर्मांतर केलेल्या शेंकडों मुली आहेत! यावरून रस्त्यानें जाणाऱ्या फुलपाखरांस पकडण्यासाठीं हें जाहीरातींचें जाळें कोणी लावलें असेल हें तुमचे लक्षांत येईल. अलीकडे येथून जव-ळच एक मोठा तेजोगोल उदय पावल्यामुळें सर्व फुलपाखरें तिकडेच धाव घेतात! व या जाहिरातीरूपी दिव्यावर कोणीच झडप घालीत नाहींत. असो. एथून आपली गाडी ४–५ मैल गेली कीं, एक लहानसें खेडेगाव लागतें. या गावास लागून एक सजल ओढा असून त्याचे काठीं साळींचे व संत्री यांचे बाग आहेत. ओढ्याचे पात्रातील एका खडकातून एक स्वच्छोदकाचा प्रवाह निघाला असून त्याचे उगमाजवळ लहानशी तळी बांधली आहे. हा प्रवाह अवर्षणाचे काळांतही कधीं बंद पडत नाहीं असें सांगतात. प्रवासी या ठिकाणीं प्रातःकाळींच आल्यास आपली स्नान-संध्या येथेंच उरकून घेतो व मग बेटावर जाण्यास निघतो; येथून बेट एक मैल लांब राहतें. ओढा उलटून पलीकडे गेलें कीं, लवकरच

येढाणें गाव दिसूं लागतो व चढाण्याचे बेटातील इमारतींचें अस्पष्ट दर्शन होऊं लागतें. बोलबोल म्हणता आपली गाडी बेटास वेढा दिलेल्या एका ओढ्यात येऊन थाबेल.

---

# प्रकरण २ रें

## नवद्वीपांत प्रवेश आणि सत्पुरुष दर्शन.

गाडींतून उतरून तुह्मीं आपलें सामानसुमान घेऊन आता कोठें जावयाचें असा विचार करीत आहां तोंच तुमचे दृष्टीस यात्रेकरूंचा गंभीर देखावा पडून भक्तिरसानें तुमचेंहि चित्त उचंबळूं लागेल. ओढ्याचे नजीक एका रुंद सडकेचे एका बाजूस रांगेनेंच नारळ, कापूर, उदबत्या, खडी-साखर व मेवा मिठाई विकण्याचीं काहीं दुकानें दृष्टीस पडतील व समो-रच रस्त्याचे डावे बाजूस एक विस्तीर्ण धर्मशाळा आढळेल; तुह्मीं आपलें सामान घेऊन या धर्मशाळेंत चला. धर्मशाळेच्या पुरद्वारचे भिंतीवर एक सूचना-फलक लावलेला तुमचे दृष्टीस पडेल, तो अवश्य वाचा. त्यात येथें प्रवाशानें कसें वागावें याच्या सूचना दिलेल्या आहेत व तुह्मास आपलें बिऱ्हाड कोठें लावावें वगैरे माहिती कोठें मिळेल तें सांगितलें आहे. बहुधा दरवाजावर तुमचें स्वागत करण्यास कोणीतरी स्वयंसेवक हजर असेलच, पण तेथें कोणी नसला तर या सूचना-फलकात सांगितलेल्या ठिकाणीं तपास करा, ह्मणजे तुमची सर्व व्यवस्था लागेल. प्रवासी आपलें बिऱ्हाड लावून स्वस्थ झाल्यावर मग त्याची दृष्टि धर्मशाळेंतील यात्रेकरूकडे वळते; तेथें एक ना दोन! शेंकडों यात्रेकरू त्याचे दृष्टीस पडतात! यात्रे-

करून वृद्ध, तरुण, विद्वान, अविद्वान, स्त्री, पुरुष, ब्राह्मण, अब्राह्मण, वैदिक, अवैदिक, स्मार्त, वैष्णव वगैरे अनेक प्रकार पाहिले ह्मणजे मनास मोठा विस्मय वाटतो, व ही सर्व मंडळी आपापल्या पंथाचा व जातींचा अभिमान टाकून ज्या देवतेस वंदन करण्यास आली त्या देवतेच्या दर्शनाची आलेल्या यात्रेकरूंची उत्कंठा वाढते. धर्मशाळेंत माणसांची कोण गर्दी, पण डोळे मिटले कीं, कानास या गर्दीचा भासही होत नाहीं इतकी येथें शांतता असते! प्रत्येक मनुष्य दुसऱ्यास त्रास न होईल अशा रीतीनें आपापला व्यवसाय करीत असतो कोणी नामस्मरण, कोणी जप, कोणी संध्या, कोणी ध्यान, कोणी गुरुचरित्राचें पारायण, तर कोणी मित्राशीं संभाषण असे अनेक व्यवसाय लोक करीत असतात पण कोठें गडबड नाहीं कीं बडबड नाहीं. तेंच एखाद्या सरकारी धर्मशाळेकडे पहा; गोंगाटानें कपाळ दुखूं लागतें! याच धर्मशाळेंतील लोक इतके शांतिब्रह्म कसे झाले? हा विचार नवीन यात्रेकरूचे मनात येतो व तोहि शांतिब्रह्म बनतो. अगदीं पहिल्यानेंच सासरीं गेलेली मुलगी जशी तेथें अदबीनें वागते तसे सर्व प्रवासी येथें अदबीनें वागतात! पण ही अदबी कोणाकरितां? ते एवढा मान कोणाचा ठेवतात? कोणाला लाजतात? अथवा कोणाला भितात बरें? लोकांना भय वाटण्यास येथें दंडुकेवाला शिपाई नाहीं कीं व्यवस्थापक कोणाकडेही डोळे वटारून पहात नाहीं, पण लोक कोणास तरी भितात एवढे मात्र खरें. यावरून येथें एखादी अदृश्य शक्ति वावरत असावी असें अनुमान होतें. तसेंच लोकांस जी भीति वाटत असते तींत पूज्यभाव दिसून येतो, यावरून ती शक्ति सात्त्विक असावी असाही मनाचा निश्चय होतो.

धर्मशाळा चौसोपी असून मध्यें विस्तीर्ण पटांगण आहे. प्रवेशद्वार अथवा देवडी प्रशस्त असून त्याचे उजवे भागीं कचेरी आहे. डावे भागचा अर्धा सोपा व त्याला लागून असणारा सोपा मिळून जी गोमुखी होते

त्यास यात्रेकरू राहातात. समोरचे सोप्यांत भोजनाची व्यवस्था व कचेरीस लागून असलेल्या सोप्यात पत्र-निष्पत्तीची व्यवस्था असते. हें स्वयंपाक-गृह जरी धर्मशाळेचा एक भाग आहे तरी धर्मशाळेतील प्रवाशास स्वयंपाक कोठें होतो हें एकदोन दिवस कळत नाहीं. स्वयंपाक घरातील धुराचें नसतें दर्शनही धर्मशाळेतील प्रवाशांस जर होत नाहीं तर त्यास स्वयंपाक-घराची माहिती व्हावी कशी !

दर सोप्यात सहा पंक्ति बसतील इतकी सोप्याची रुंदी आहे व दर पंक्तींत ५० पान बसण्याइतकी लांबी आहे. मधले पटांगणात ६०० पर्यंत पात्रें बसतील एवढें क्षेत्र आहे. येथील स्वच्छता तर आश्चर्य वाटण्या-सारखी आहे. रोज दोन अडीचशें लोकाची सारखी वर्दीवळ असून कोठेंही केरकचरा आढळत नाहीं! तुम्ही धर्मशाळेच्या पटांगणात अगर रस्त्यात कोठेंही एकादी फळाची साल टाका व एकदोन मिनिटांनीच तिकडे पाहा तेथें तुम्हास ती दिसणार नाहीं! येथें इतकी स्वच्छता ठेव-णारे दक्ष नोकर तरी कोण ? असें साहाजीक मनात येतें व प्रवासी घट-काभर विचारात मग्न होतो. या धर्मशाळेस लागूनच एक लांबलचक सोपा काढलेला आहे त्यांत धान्य, स्वयंपाकाची भांडीं व सर्व भोजन-साहित्य असून कांडण दळण येथेंच होतें. या सोप्याचे मागले बाजूस एक विस्तीर्ण वृक्ष वाटिका असून तींत स्नानगृह बांधलेलें आहे. या स्नानागारांतील पाणी तापविण्याचा हांडा म्हणजे उष्णोदकाचें लहानसें तळेंच होय. हें उष्णोदकाचें तळें शेजारच्या विहिरीवर लावलेल्या पंपाचे साह्याने भरण्याचें काम दुपारचे बारा वाजेपर्यंत सारखें चालू असतें व त्यातून उष्णोदक उपसण्याचें कामही त्याच प्रमाणात सुरू असतें. विहीर फार मोठी असून पाणी मधुर व विपूल आहे. विहिरी सभोंवार उत्तम दगडी फरशी असून स्नानाची व धुण्याची सोय आहे. ठिकठिकाणीं हातरहाट व गड-गडे लावून पाणी काढण्याची व्यवस्था केलेली आहे. ब्राह्मण व इतर हिंदू याच्या स्नानाच्या जागा पृथक आहेत.

यात्रेकरु स्नानसंध्या करून शुचिर्भूत होऊन प्रथम श्रीदत्ताचे दर्शनास जातो. अस्नात मनुष्यानें दर्शन घ्यावयाचें नाहीं अशी वहिवाट आहे व तो योग्य आहे. दत्त-मंदीर भव्य असून मूर्तीही सुंदर आहे. देवळाचा प्राकार मोठा विस्तीर्ण असून एकंदर देखावा भक्तिरसाला पोषक व गंभीर आहे. श्रीदत्ताचें दर्शन घेतल्यानंतर यात्रेकरू एका दिव्य मूर्तीचे दर्शनासाठीं जातात. देवळापासून सुमारें पांचशें पावलांवर या दिव्यमूर्तीचें निवासस्थान आहे. [illegible]

दिसणारा लहानसा ओढा असून त्याच्या दोन्ही बाजू दगडानीं बांधून काढल्या आहेत. हा ओढा अथवा नाला या निवासस्थानाला मेखला घातल्याप्रमाणें शोभा देतो. या नाल्यावर एक दोन लाकडी पूल आहेत. आपण एका पुलावरून पुढील विस्तीर्ण पटांगणांत चला, कयास्मिरी पाषाणानीं निर्माण केलेलें तेथील सुंदर तुलसी वृंदावन पाहा. तुलसी वृंदावनाचे समोर असणारें भजनमंदीर पाहून तुम्हास आपण राजमहालच पाहात आहों असें वाटेल. तुम्हीं येथें केव्हाही जा, तुमचे कानावर दत्तनामाचा मधुरध्वनि पडल्यावाचून राहणार नाहीं. येथें श्रीदत्त नामाचा अखंड घोष चालू असतो. प्रत्येक वेळीं चार ब्राह्मण नामपाठास बसलेले असतात. दर प्रहरास या नामपाठकांची बदली होते कीर्तन, प्रवचन, पुराण वगैरे धार्मिक कृत्यें याच भजन–मंदिरांत होतात. या भजनमंदिरांत एक सुंदर झोंपाळा टांगलेला दिसेल. झोंपाळ्यावरील मृदु गाद्या पाहून हा झोंपाळा एखाद्या उत्सवमूर्तीचा असावा असें तुम्हीं आपले मनाशीं ठरवाल. ही उत्सवमूर्ति शरीरानें व मनानें या झोंपाळ्यावरील गाद्यापेक्षाही मृदु आहे असें तुमचे प्रत्ययास पुढें लवकरच येईल. असो. या भजनमंदिराचे मागले बाजूस एक रमणीय प्रासाद आहे. तिकडे आतां चला. ती दरवाजांत शिला-तलावर बसलेली दिव्य मूर्ति पाहा. हीच या ठिकाणची अधिष्ठात्री देवता होय. आपण या देवतेचे पुढें नारळ, कापूर, उदबत्त्या व खडीसाखर ठेवून वंदन करा व नारळाचा प्रसाद घेऊन कृतार्थ व्हा.

श्री ... ग्रंथ ...

या प्रासादाचा बाह्य देखावा पाहूनच अंतर्भागाची कल्पना आम्हीं केली. कारण प्रासादाचे अंतर्भाग आमचे दृष्टीस पडलेले नाहींत पण ते फार रमणीय असावेत असें वाटतें. भजनमंदिराचे पटांगणांत उभें राहिलें ह्मणजे उजवे हाताकडे एक पूल दिसतो व त्यावरून एका सुंदर बंगल्याकडे एक मार्ग जातो. हा बंगला श्रीमंत डी. गंगाधरराव कामटीकर यांचा आहे. श्रीमंत कामटीकर हे नागपूर प्रांतांतील कामटी गावचे बडे व्यापारी, जमिनदार व कारखानदार आहेत येथील देवतेचे ते एकनिष्ठ भक्त आहेत व बहुतेक येथेंच राहतात. कामटीकरांचे बंगल्याचे शेजारीं चाळीसारख्या कांहीं इमारती आहेत, त्यात सेवेकरी लोक राहतात. दत्त मंदिराजवळ एक मुलांची शाळा, दवाखाना व पोष्ट आफीस आहे. शाळेंत ७५–८० मुलें असून तीं सेवेकरी व आजूबाजूचे खेड्यातील गरीब लोकांचीं आहेत. मुलांचे जेवणाखाणाची व राहण्याची सोई येथें फुकट होते. या छोट्या नगरीचे सभोंवार असणाऱ्या संत्रें–मोसंब्याच्या बागांनीं या नगरीस अपूर्व शोभा आली आहे. या नगरीची लांबी सरासरी पाव मैल व रूंदी तर हजार फूटच भरेल; पण ही इतकी सुंदर आहे कीं चित्रपटांतील एक मनोहर देखावाच पहात आहों असें प्रेक्षकास वाटतें.

आता येथील भोजनाची व्यवस्था सांगून हें प्रकरण संपवू. दुपारचे बारा वाजता भोजनास सुरवात होते. प्रतिदिवशीं दर वेळेस २५० पान होतें! शिवाय ५०–६० महार लोकांस पोट भरण्याइतकें अन्न देण्यांत येतें. या भोजनास भोजन न ह्मणतां प्रसाद ह्मणण्यात जास्त औचित्य असल्यामुळें आपण त्यास प्रसादच ह्मणू. प्रसादास भात, साकर, आमटी, जोंधळ्याच्या कण्या व ताक असतें. प्रसाद साधाच खरा पण तो इतका अमृतोपम असतो कीं, 'जें न नृप–प्रसादें तें मुनिच्या भुक्तिसुख दिलें वाटजें' असे उद्गार सर्वांच्या मुखांतून निघतात! भोजनाचे आरंभीं अन्नसूक्त ह्मणतात व नंतर दरारोज एकदोन श्लोक ह्मटल्याबरोबर भोजनास

सुरवात होते. आपलें भोजन आटोपलें तरी खाणावळींतल्यासारखें पंक्ती-तून मध्येंच उठावयाचें नाहीं असा नियम आहे. सर्वांचें भोजन आटोपल्या-बरोबर व्यवस्थापक उठण्याची सूचना ह्मणून एक श्लोक ह्मणतात तो ह्मणून होताच मंडळी उठून मागील दारीं हात धुण्यास जाते. हस्तप्रक्षालन करून मंडळी परत आपले जाग्यावर येऊन धोतरें नेसू लागतात न लाग-तात तोंच उष्टीं काढून तेथें नवीं पानें मांडलेलीं त्याचे दृष्टीस पडतात! सरासरी चार दोन मिनिटांतच ही सर्व व्यवस्था होऊन गेलेली असते. हा प्रकार पाहून येथें उष्टीं काढण्याचें एकादें यंत्र तर नसेल ना? असें पाह-णाराचे मनांत येतें. पण येथें या एकाच कामाचें आश्चर्य वाटण्यास नको. येथील सर्वच कामें यंत्राप्रमाणें झटपट व बिनबोभाट होतात. स्वयंपाक कोठें होतो, कोण करितो, किती होतो याची कोणाला दादही लागत नाहीं. आयतेवेळीं शंपन्नास लोक अधीक आले तरी खोळबावें लागत नाहीं, कीं अन्नास तोटा येत नाहीं! यावरून अन्नपूर्णागृहात एकादी कामधेनु तर नसेल ना? असा भास होतो. जेवतांना नारायण आणावेगिल कोणताच ध्वनि कानावर पडत नाहीं, सर्वत्र अगदीं शांतता असते. भोज-नगृहाचे वर असलेल्या माळ्याकडे केव्हांही पाहिलें तरी तो पत्रावळीचे पुड्यांनीं सदोदित भरलेला दिसतो; लाख पाऊणलाख पत्रावळी नेहमीं शिल्लक असलेल्या दिसतात. धान्यागाराकडे पाहिलें तरी तेंही सदोदित भरलेलेंच दिसतें! सारांश, येथे अमुक पदार्थ संपला अगर कमी झाला असें कधींच होत नाहीं. समुद्र जसा उन्हाळ्यात आटत नाहीं व पावसा-ळ्यात वाढत नाहीं तसाच येथील प्रकार आहे. दुपारीं बारा वाजल्यानंतर अगदीं अवेळींसुद्धा एकादा यात्रेकरू आला तर त्यास जेवणाची पंचाईत पडत नाहीं. सायंकाळचे चार वाजेपर्यंत 'कोणी जेवणारे आहेत काय?' असा तपास होत असतो! कोणी शास्त्री, वैदिक, हरदास, पुराणीक अगर गुणीजन आले तर त्यांच्या योग्यतेप्रमाणें सत्कार होतो. यात्रेकरू जास्त

दिवस राहिला तरी 'अर्धचंद्रेण राघव' अशी लोंचट जावयाचे संभावने-प्रमाणें त्याची संभावना होत नाहीं. याप्रमाणें येथील एकंदर व्यवस्था आहे. ही व्यवस्था पाहून पुढील विचार मनात येतात. (१) हें बेट ऊर्फ सुंदर नवद्वीप कोणी व कधीं निर्माण केलें? (२) येथें असणारी ही दिव्य मूर्ति कोण? (३) यंत्राप्रमाणें कामें करणाऱ्या य इमानी नोकरास पगार काय आहेत? (४) व येथील हा अवाढव्य खर्च करणारा कुबेर तरी कोण असावा? या प्रश्नाचीं उत्तरें पुढें देऊं पण 'भीषास्माद्वातः पवते! भीषोदेति सूर्यः!' अशा सर्व शक्तिमान प्रभूचीच ही लीला आहे असें समजावें'

---

# प्रकरण ३ रें

## परिचय

मागील प्रकरणात जी दिव्य मूर्ति म्हणून सांगितली ती सुप्रसिद्ध श्री नारायण महाराज केडगावकर याची होय. नारायण महाराज व केड-गाव यांचा वास्तविक संबध काहींच नाहीं. महाराज ज्या नवद्वीपात राह-तात त्या नवद्वीपास जाण्यास केडगाव हें स्टेशन आहे इतकेंच. यावरून केडगावचा महाराजावरील हक्क केवळ शेजार संबंधामुळेंच असून तेवढ्या हक्कामुळेंच त्यास केडगावकर म्हणतात. महाराजाचें निवासस्थान बढाणें गावचे नवद्वीपांत असल्यामुळें त्यास बढाणेकर म्हणणें योग्य किंवा त्याची जन्मभूमि बागलकोट असल्यामुळें त्यास बागलकोटकर म्हणणें योग्य. पण महाराजाचा योग असा दिसतो कीं, त्याची जन्मभूमि, त्याचें निवासस्थान व त्याची जनकजननी यापैकीं कोणासच महाराजासंबंधानें कीर्तिसुखाचा लाभ अंतर्दृष्ट्या मिळाला तरी बहिर्दृष्ट्या मिळूं नये! वाचकांस या गोष्टी पुढचे प्रकरणात कळतीलच.

श्री नारायण महाराज ही दिव्यमूर्ति मुंबई इलाख्यांतील अनेक लोकांनीं प्रत्यक्ष पाहिलेली आहे. प्रत्यहीं शेंकडों लोक त्याचें दर्शन घेऊन जात आहेत व त्यांचें नाव तर सर्वांसच श्रुत आहे. तर मग आम्ही महाराजाचा लोकांस जास्त परिचय तो काय करून देणार? असें आह्मांस लोक विचारतील. पण परिचय ह्मणजे काय? परिचय ह्मणजे तोंड-ओळख एवढाच अर्थ असता तर वरील प्रश्न योग्य होता. पण परिचय ह्मणजे तोंडओळख नव्हे, हें लक्षात ठेवावें. परिचय होणें फार कठीण काम असतें. भगवान् ह्मणतात,

'मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्वतः।'

यावरून खरा परिचय होणें किती प्रयासाचें आहे, याची कल्पना होईल. भगवान् श्रीकृष्णाची खरी ओळख त्यांचे मातापित्यासही पुष्कळ दिवस झाली नव्हती, मग पेंद्या-गोद्याची गोष्ट कशाला? श्रीकृष्णास कोणी पुत्रभावानें तर कोणी मित्रभावानें ओळखणारे होते, पण त्यांस तत्वतः जाणणारे उद्धवासारखे थोडेच लोक होते हें लक्षात ठेवलें पाहिजे. कंस-चाणूरादिक तामसी पुरुष तर श्रीकृष्णास शत्रु मानीत हें सर्वांस माहीत आहेच. तात्पर्य 'यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्वतः।' असें भगवंतांनीं का ह्मटलें हें आतां आपले ध्यानांत येईल. जी गोष्ट भगवान् श्रीकृष्णांची तीच श्री नारायण महाराजाची. नारायण महाराजाचें दर्शन अनेकांस घडलें असेल, त्यांचे सान्निध्यांत पुष्कळ लोक असतील, बऱ्याच लोकांनीं त्यांची सेवा केली असेल व त्यांच्याविषयीं बहुत लोकांची भक्तिहि असेल. पण 'कश्चिन्माम् वेत्ति तत्वतः' असें आमचें स्पष्ट मत आहे. तसेंच श्री नारायण महाराजाचे जसे अनेक भक्त आहेत तसे शिशुपालासारखे कित्येक निंदकही आहेत हें आह्मी अनुभवपूर्वक सांगतों. आह्मी निंदकास दोष देत नाहीं व स्तुति-पाठकांस वाखाणीत नाहीं; कारण खरा परिचय नसतां केलेली

९।४२६(१५)

स्तुति अगर निंदा तर्कीत: त्यांच्याच किमतीची असते. अननुभवी स्तुति-पाठक 'परप्रत्यय नेय बुद्धिः' असण्याचा संभव असतो. कोनंदके 'पर-प्रत्यय नेय बुद्धिः' असून शिवाय तर्कटी तार्किक असतात; वास्तव त्यांनी उभयतांसही एकाच माळेंत गोंवतों. सारांश, तोंड ओळखीचा परिचय हा खरा परिचय नव्हे. आपणास आपले घरापुढील अंगणांत असणाऱ्या अनेक वनस्पति नावानें माहीत असतात, पण कोणी त्यांचे गुणधर्म विचा-रील तर आपणांस गप्प बसावें लागेल. वनस्पतींचा खरा परिचय न झाल्यामुळें त्या आपले सन्निध असूनही रोगाचा प्रतिकार करण्याचे कामीं आपणास त्याचा उपयोग करून घेता येत नाहीं. घरांत कामधेनु असून किंवा देव्हाऱ्यात चिंतामणी असून परीक्षेचे अभावीं भुकेनें व्याकूळ होण्याची पाळी येते, त्याप्रमाणें सत्पुरुषाची भेट होऊनही जर त्याचा खरा परिचय न होईल तर मनाची तळमळ कमी होणार नाहीं. यास्तव सत्पुरुषाचा खरा परिचय करून घेणें अत्यंत जरूरीचें आहे. व्यक्तीच्या बाह्यस्वरूपाची ओळख होणे फारसें कठीण नाहीं, कारण ज्याला दृष्टि आहे त्याला ती व्यक्ति नुसत्या डोळ्यांनीं ओळखता येईल. पण अंतःस्वरूप लौकिक दृष्टीच्या पलीकडे असल्यामुळें तें मात्र सर्वांस दिसणार नाहीं. सामान्य फोटोग्राफर मनुष्याचें बाह्यस्वरूप फोटोंत यथातथ्य उठवून दाखवितो. पण शरिराचे अंतर्भाग त्या फोटोंत त्यास उठवितां येत नाहींत. अंतर्भागाचा फोटो घेण्यास एक्स (X) किरणाचेंच साह्य लागतें. त्याप्रमाणें सत्पुरुषाचें अंतरंग पाहण्यास ज्ञानकिरणांचीच जरूरी आहे हें लक्षांत ठेवावें. ज्ञान-किरणाची उत्पत्ति श्रद्धेवांचून होणार नाहीं व चित्तशुद्धीवांचून श्रद्धा नाहीं म्हणून प्रथम चित्तशुद्धि केली पाहिजे. आहार-विहार सात्विक असल्यावांचून चित्तशुद्धि होणार नाहीं. म्हणून साधकानें आहार विहारा-कडे लक्ष देणें जरूर आहे. ओढाळ गाईचे गळ्यांत लोढणें बांधून त्याप्र-माणें तिला ताळ्यावर आणतात त्याप्रमाणें मनोरूप गाईचे [illegible] अग-

वज्ज्ञानरूप लोढणा सदोदित बांधला पाहिजे. इतकें केल्यावाचून अंतः-स्वरूपाचें दर्शन करून देणारे ज्ञान-किरण कोणासही प्राप्त होणार नाहींत. ज्ञान किरणाच्या उत्पत्तीला साधनीभूत अशा ज्या गोष्टी आम्हीं सांगि-तल्या त्या आम्हास जशा चटकर लिहितां आल्या तशा वाचकासही चटकर वाचतां येतील, पण त्या साधण्यास मात्र अतिशय परिश्रम पडणार आहेत हें लक्षात ठेवावें. सद्गुरूचें यथार्थ दर्शन होणें, ह्मणजे जवळ जवळ आत्मस्वरूपाचेंच ज्ञान होणे होय. आत्मस्वरूपाचें ज्ञान होणे किती कठीण आहे तें स्वतः भगवानच सांगत आहेत—

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनं ।
आश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ॥
आश्चर्यवद् चैवमन्यः शृणोति ।
श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥

एवच सद्गुरूचा परिचय होणें किती कठीण आहे हें आपल्या ध्यानात येईल. हा परिचय ज्याचा त्यानेंच करून घ्यावयाचा आहे. तो आमचे सारख्या अनधिकारी मनुष्यास तर मुळींच करून देता येणार नाहीं. कदाचित् सद्गुरूचीच कृपा झाली तर ते आपलें यथार्थ स्वरूप शिष्यास दाखवू शकतील. इतकेंच नव्हे तर ‘ आपणासारिखे करिती तात्काळ ’ असा त्याचा अधिकार आहे. पण एवढी गुरु कृपा होण्यास गुरु सेवेचें तप असेंच पाहिजे. ‘ यथा देवे तथा गुरौ ’ अशी गुरूवर श्रद्धा पाहिजे व ‘ मुख्यत्वे पाहिजे गळाली अहंता ’ हें ध्यानात ठेवून निरहंकार होऊन गुरूस शरण गेलें पाहिजे. भगवंतानीं अर्जुनास आपलें विश्वरूप दाखविले. पण तें केव्हा ? तो ‘शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नं’ असें ह्मणाला तेव्हा. आणि ही गोष्ट अर्जुनाचे सबंध आयुष्यात केवळ एक वेळच घडली हें लक्षात ठेवावें. साराश आम्हीं या प्रकरणात ज्ञान-किरणाची प्राप्ती होण्याचे जे मार्ग लिहिले आहेत ते संपादन करावे व

अहंकाराचा त्याग करून गुरूला शरण जावें ह्मणजे त्याचे यथार्थ दर्शन होईल एवढें सांगून. हें परिचय प्रकरण पुरें करितों.

---

# प्रकरण ४ थें

## दिशाभूल.

सत्पुरुषाचा परिचय करून घेण्याचे मार्गांत वाट चुकणारीं कांहीं ठिकाणें आहेत. यास्तव तीं जरूर सांगितलीं पाहिजेत. कारण पुष्कळ लोक अशा ठिकाणीं फसतात व भलतीकडेच जातात! सत्पुरुष शब्द कानावर पडला कीं तो काय चमत्कार करून दाखवितो असा जो तो प्रश्न करतो! सत्पुरुष व चमत्कार यांचे हें साहचर्य इतकें दुर्निवार झालें आहे कीं, जेथें चमत्कार नाहीं तेथें सत्पुरुषपणाच नाहीं असें लोक समजतात! व याच समजुतीनें प्रत्येक सत्पुरुषाच्या चरित्रांत 'चमत्कार प्रकरण' असावयाचेंच असा नियम आहे. पण आमचे मतें सत्पुरुष व चमत्कार यांचा कांहींच संबंध नाहीं. खरे सत्पुरुष बुद्धिपुरःसर कधीच चमत्कार करून दाखवित नाहींत. कारण ते जादुगार नसतात. आतां कदाचित त्यांचे हातून त्यांना नकळत असे कांहीं चमत्कार साहजिक होत असतील. पण त्याचें कर्तृत्व त्याकडे येत नाहीं. 'तस्य कर्तारमपि मां विध्य कर्तारमव्ययं' या भगवद्वाक्याप्रमाणें ते अकर्तेच असतात. यास्तव सत्पुरुष चमत्कार करतात असें ह्मणण्याऐवजीं त्यांचे हातून चमत्कार होतात असें ह्मणणें योग्य. या ह्मणण्यांत औचित्य व सत्य दोन्हीं आहेत. कोणी ह्मणेल 'होतात' व 'करतात' यांत फरक काय? शब्दभेद झाला इतकेंच ना? बाकी अर्थ एकच पण असें नाहीं. त्यांचा अर्थ एक नाहीं इतकेंच नव्हे, तर त्यांत जमीन अस्मानाइतकें अंतर आहे. एकांत कर्म-

बुद्धि असतें तर ती दुसऱ्यास नसते. एक हेतुपूर्वक केलें जातें तर दुसरें सहज होतें. या फरकामुळें त्यांचें सामान्याधिकरण नाहीं. रेड्याकडून वेद बोलविणें, पाषाणाचे मूर्तीकडून नैवेद्य खावविणें, भिंत चालविणें व मेलेलीं माणसें जिवत करणें असले अलौकिक चमत्कार सत्पुरुषांनीं करून दाखविले अस वर्णन अनेक चरित्रग्रंथात आढळतें. या वर्णनावर आधुनिक चिकित्सकाची श्रद्धा बसत नाहीं व ते तीं वर्णनें खोटीं आहेत असें बेधडक ह्मणतात. त्याची श्रद्धा बसो अगर न बसो, तीं वर्णनें सर्वथैव खोटीं आहेत असें ह्मणण्याचें धाडस आह्मास करवत नाहीं. वरील गोष्टी घडणें असमवनीय आहेत असें आह्मांस वाटत नाहीं. अलीकडे मुंबईचा एक फकीर इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका वगैरे देशात असलेच अलौकिक चमत्कार करून दाखवित असतो. पाश्चात्य शास्त्रज्ञासही या चमत्काराचें कोडें उलगडत नाहीं. जादुगराचे चमत्कारावर जर आमचा विश्वास आहे तर सत्पुरुषाचे चमत्कारावर तो का नसावा? त्यांचे हातून ते चमत्कार झाले नसतील असें का समजावें? व सत्पुरुषाचीं चरित्रें अविश्वसनीय का मानावीं?

स्वप्न-सृष्टि जाग्रतींत खोटी ठरली तरी स्वप्न-काळात खरीच असते. भय कंपादि विकार जागें झाल्यावरही कांहीं वेळ कायम असतात. स्वप्नांतील स्त्रीसभोग खोटा असला तरी रेतच्युति खरी असते. साराश स्वप्नसृष्टि खोटी आहे व खरीहि आहे. स्वप्नसृष्टीप्रमाणें सत्पुरुषास मनोमय सृष्टि उत्पन्न करण्याचें सामर्थ्य असतें व ते त्या सृष्टींत पाहिजे त्यास घेऊन जातात व तेथें त्यास पाहिजे तो चमत्कार दाखवूं शकतात! साराश चमत्कार अद्भुत असले तरी ते खोटे आहेत असें ह्मणण्याचें कारण नाहीं. मात्र सर्वच सत्पुरुष चमत्कार करीत होते असें आमचें ह्मणणें नाहीं. आम्हीं असेंही म्हणूं कीं सत्पुरुषाचें महत्व वाढविण्यासाठीं त्याच्या प्रेमळ शिष्यांनीं आपल्या गुरूचे गळ्यात चमत्काराचा हार बळेंच लादला असेल! आम्हास

या गोष्टीचें कांहींच महत्व वाटत नाहीं. कारण चमत्कार साधुत्वाचे दर्शक आहेत अगर साधुत्वास त्याची जरूरी आहे असो प्रकार नाही. चमत्कार करून दाखविल तो सत्पुरुष असें कोणी समजू नये. असें समजलें तर वर सांगितलेल्या फकीरास अगर एकाद्या जादुगाराखही सत्पुरुष मानावें लागेल. लोकांस चमत्कार दाखवून त्याचें रंजन करण्याची सत्पुरुषास जरूर नसते. पण एकादेवेळ दया दाक्षिण्यादि गुणानीं त्यांची इच्छाशक्ति प्रबळ होते व त्यावेळीं त्याचे हातून साहजिक चमत्कार घडतात! अणिमादि अष्टसिद्धी संपादन केलेला पुरुष अनेक चमत्कार करून दाखवील. तो अंगुष्ठप्रमाण होऊन एकाद्या छिद्रातून पटकन उडी मारील अथवा ताडाइतका उंच होईल! तो कापसाप्रमाणें हलका अथवा पाषाणाप्रमाणें जड होईल! तो जड पदार्थांत चैतन्य उत्पन्न करील अथवा वाघाचा कान धरून त्याला ओढीत आणील! पण केवळ एवढ्यानेंच तो सत्पुरुष ठरणार नाहीं. फार झालें तर नामांकित जादुगार ठरेल. वरील सिद्धि प्रपंचसाधक आहेत. त्या परमार्थसाधक नाहींत, तर उलट परमार्थाला बाधक आहेत. ह्मणून सत्पुरुष सिद्धीचे नादास लागत नाहींत. लोकांस चमत्कराचें नाटक दाखवून त्याकडून सुवर्णपदकें मिळविण्याची सत्पुरुषास इच्छा नसते. जादुगार आपले विद्येबद्दल प्रशंसापत्रें मिळवितो व आपले खेळाच्या जाहिराती देतो. सत्पुरुष अशीं प्रशस्तिपत्रें मिळवित नाहींत व जाहिरातीही देत नाहींत. सिद्धि प्राप्त झालेला पुरुष सामान्य लोकांपेक्षा बराच वरच्या योग्यतेचा असतो व तो सत्पुरुषपदाच्या सन्निध असतो. मात्र तो सत्पुरुषपदावर आरूढ होण्यापूर्वी ईश्वर त्याला सिद्धींची लालूच दाखवून त्याची परीक्षा करीत असतो. जो सिद्धींना भुलतो तो फसतो व सत्पुरुषपदावर आरूढ होण्याऐवजीं उलट चार पावलें मागें येऊन इतर लोकांच्या बरोबरीचा होतो. जो पूर्णावस्थेस पोंचलेला नसतो त्यास आपले सिद्धींचें प्रदर्शन करून वाहवा मिळवण्याची

इच्छा होते पण पूर्णावस्थेस पोंचलेल्या पुरुपास सिद्धि कवडी-मोल वाटत असतात. पुढील गोष्ट सिद्धींची तुच्छता पटण्यास बरीच उपयोगी पडेल. "एकदा दोन गृहस्थ प्रवासास निघाले. हे दोघेही अष्टसिद्धि संपादन केलेले असून सत्पुरुष म्हणून प्रसिद्ध होते. दोघानीं आपापले शिष्य बरोबर घेऊन प्रवासाची तयारी केली. जाता जाता वाटेंत नदी आली व नदीस पूर फार असल्यामुळें पलीकडे कसें जावें हा विचार पडला. तेंव्हा एका गृहस्थानें सिद्धीचे सामर्थ्यानें आपल्या शिष्यासह पाण्यावरून चालत जाऊन पैल तीर गाठलें! पण दुसऱ्यानें तसें केलें नाहीं, त्यानें चार पैसे देऊन एक होडी केली व तींत बसून तो शिष्यासह पलीकडे गेला याप्रमाणें दोघेही पलीकडे पोंचलें. पण पाण्यावरून चालत गेलेल्या मंडळीस आपले गुरूचे सामर्थ्याचा मोठा अभिमान वाटला व ते दुसऱ्या गुरूचे शिष्यमंडळीकडे तुच्छतेनें पाहू लागले. तेव्हा ते शिष्यहि आपले मनात लाजल्यासारखे झाले. आमच्या गुरूचें सामर्थ्य कमी असावें असेंहि त्याचे मनात आले व आपले गुरूजी त्या दुसऱ्या गृहस्थाप्रमाणें सिद्धीचे सामर्थ्यानें का आले नाहींत याचें कारण, आपले गुरूस विचारण्याचें त्यानीं ठरविलें व गुरूस प्रश्न केला. तेंव्हा गुरु म्हणाले 'आपणास होडीवाल्यास काय द्यावें लागलें?' शिष्य म्हणाले 'चार पैसे.' गुरु म्हणाले 'या आमच्या मित्रानीं सिद्धीचा उपयोग करून किती पैसे वाचविले?' शिष्य म्हणाले 'चार पैसेच!' गुरु म्हणाले 'तर मग यांच्या या सिद्धीची किंमत या ठिकाणीं किती पदरात पडली?' शिष्य म्हणाले 'चार पैसे!' गुरु म्हणाले 'एकूण यानीं आपले सिद्धीचें येथें दुकान उघडून त्याची किंमत चार पैसे करून घेतली हें तुम्हास बरें वाटलें काय?' हें भाषण ऐकताच सर्वांचे मनात प्रकाश पडला व पाण्यावरून चालत आलेल्या गृहस्थाचाही गर्व नष्ट झाला."

सारांश, चमत्कार करण्याचें अंगीं सामर्थ्य असून सुद्धां खरे सत्पुरुष चमत्कार करून लोकांत प्रतिष्ठा मिरवीत नाहींत. ज्ञानेश्वर महाराजांनीं भिंत चालवून दाखविली पण ती कशाकरितां? चांगदेवापेक्षा आपण मोठे आहों हें दाखविण्याकरितां नव्हे, तर वाघावर सत्ता गाजविण्याची आपणास शक्ति आहे असा चांगदेवास गर्व झाला होता तो त्याचा गर्व नष्ट करावा व त्याला खरा कल्याणाचा मार्ग दाखवावा याकरितांच होय. चंद्र, सूर्य व अखिल ग्रहमंडळ आपापल्या कक्षेतून ज्याच्या शक्तीनें फिरत आहे त्या सर्वेश्वराकडे ज्याचें चित्त लागतें त्या पुरुषास चार दोन हात लांबीचा भिंतीचा तुकडा चालवून दाखविण्यात मोठासा अभिमान वाटणें शक्यच नाहीं. सत्पुरुषास तुम्हीं चमत्कार करून दाखवा असें कोणी सांगितलें तर ते तसें करणार नाहींत. * त्यांचे हातून यदृच्छेनें जे जे चमत्कार घडतील ते ते लोकांनीं पहावे.

वरील विवेचनावरून जे लोक केवळ चमत्कारांना भुलून एकाद्याचे नादास लागतात ते एकाद वेळ सत्पुरुषाचे भ्रमानें जादुगाराचे जाळ्यांत पडण्याचा संभव आहे. तसेंच एकादा सत्पुरुष आपले शेजारीं असूनही तो चमत्कार दाखवीत नाहीं म्हणून लोक त्याचे दर्शनास जाणार नाहींत व आपले कल्याणास मुकतील. वास्तव हें दिशाभूल प्रकरण वाचून प्रत्येकानें बोध घ्यावा. आम्हांस अनेक लोकांनीं नारायण महाराज काय चमत्कार करतात? असे प्रश्न केल्यामुळेंच आम्हीं हें प्रकरण लिहिलें आहे चमत्कार सत्पुरुषाची थोरवी दाखवीत नाहींत, इतकेंच नव्हे तर ते त्यांस

---

* श्री नारायण महाराजांस मागें पुण्याच्या एका वर्तमान पत्रकारानें 'तुम्हीं सत्पुरुष असाल तर जाहीर समारंभ करून एकादा चमत्कार करून दाखवा' असें आव्हान केलें होतें! यावरून मोठे मोठे शहाणे म्हणविणारे लोक सत्पुरुषाकडे कोणत्या दृष्टीनें पाहतात याचें अनुमान करावें.

( फाटकर कृत नारायण महाराजांचें चरित्र पहा. )

कांहींसें गौणत्वच आणतात, असें आमचें मत आहे. तथापि सहज घड-लेले चमत्कार अथवा जे चमत्कार हवे तेव्हां पाहण्यास मिळतात ते वर्णन करण्यास हरकत नाहीं; म्हणूनच आह्मीं पूर्व परंपरेस अनुसरून पुढील प्रकरण लिहितों.

---

# प्रकरण ५ वें

## चमत्कार

श्रीयुत काटकर यांनीं श्री नारायण महाराजांचें लहानसें चरित्र प्रसिद्ध केलें आहे, त्यात महाराजानीं केलेल्या एक दोन चमत्काराचा त्यानीं उल्लेख केला आहे. महाराज लहानपणीं आपले सवगड्यास दग-डाची खडीसाखर करून खाण्यास देत! व ते भजनात रंगून जात तेव्हा त्यांचे हातातून गंगा पडत असे! हे गंगोदक प्राशन केलेले लोक अद्याप आहेत व ते ही गोष्ट सांगतात असें काटकरांनीं लिहिलें आहे. काट-करानीं हे चमत्कार श्रद्धेनें लिहिले यांत शंका नाहीं. पण ते लिहिते वेळीं त्यास एक शंका आली ती अशी—महाराजानीं पूर्वी हे चमत्कार केले हें जर खरें आहे तर ते आता बंद का? आतां ते भजनात रंगत नाहींत कीं काय? व जर ते आताही भजनात रंगतात तर त्याचे हातातून गंगेचा प्रवाह अलीकडे का वाहात नाहीं? राजापूरची गंगा अलीकडे जशी रुसून बसली आहे तशी महाराजाचे हातातील गंगाही रुसून बसली कीं काय? असा कोणीं प्रश्न केल्यास त्यास काय उत्तर द्यावें हा काट-करांस विचार पडला पण त्यानीं अर्पण पत्रिकेंत लिहिल्याप्रमाणें त्यास वडिलाकडून आत्मिक ज्ञानाचा अनुभव आलेला असल्यामुळें त्यास

वाचकाचें समाधान करण्यास सहज युक्ति सुचली! काटकर ह्मणतात 'सत्पुरुष, लोकांनीं आपणास ओळखावें ह्मणून आरंभीं चमत्कार करून दाखवितात. एकदा ओळख पटली, कीं चमत्कार बंद!' काटकरांनीं केलेली ही चमत्काराची कारणमीमांसा अपूर्व नाहीं असें कोण ह्मणेल?

आपली ओळख पटावी ह्मणून सत्पुरुष आरंभीं चमत्कार करून दाखवितात असें ह्मटलें तर त्यास कीर्तीची हाव असते असें सांगितल्याप्रमाणें होतें व त्याचे साधुत्वास गौणत्व येतें. शिवाय ओळख पटल्यावर चमत्कार बंद! हें लिहिणें तर अगदींच खुळेपणाचें होय. कारण ज्यांनीं चमत्कार पाहिले असतील त्यांना ओळख पटली असेल पण ज्यांनीं पाहिले नसतील त्यांची वाट काय? चमत्कार पाहिलेल्या लोकांनीं साक्षी दिल्या तरी मनाचें समाधान होणार नाहीं व मळमळ जाणार नाहीं. यास्तव सत्पुरुषांनीं चमत्काराचें नाटक—यह चोवीस तास उघडें का ठेवू नये? नारायण महाराजांचे हातून झालेल्या चमत्कारांवर आमची श्रद्धा आहे पण ते चमत्कार त्यांनीं बुद्धिपूर्वक प्रसिद्धीकरितां केले नसून त्यांचेकडून लीलेनेंच झाले असें आह्मीं ह्मणतों. महाराजांनीं ते बुद्धिपूर्वक केले असतील तर त्याचें स्मरण त्यास असलेंच पाहिजे, याकरितां काटकरांनीं महाराजास 'आपण चमत्कार केले होते काय?' असा प्रश्न करावा व ते काय उत्तर देतात तें ऐकावें. 'मला माहीत नाहीं' असेंच ते उत्तर देतील अशी आमची खात्री आहे. कारण त्या चमत्काराचा कर्तृत्वाभिमान महाराजांचे ठिकाणीं नसल्यामुळें व त्यांनीं ते प्रसिद्धीकरितां केलेले नसल्यामुळें महाराजास ते कसे बरें आठवतील? सत्पुरुषाकडून होणारे चमत्कार आपण निराळ्या दृष्टीनें पाहिले पाहिजेत. आह्मीं या प्रकरणांत जे चमत्कार दिले आहेत ते 'चक्षुर्वै सत्य' असे आहेत. पाहिजे त्यानें पाहिजे तेव्हां पाहावे. आतां कदाचित कोणास ते चमत्कार न वाटले तर त्यास आमचा उपाय नाहीं; 'भिन्न रुचिर्हि लोकाः' असेंच समजावयाचें.

## चमत्कार १ ला.

लीला–विग्रह–समर्थ अशा ईश्वरानें मानव देह धारण करून गुप्त राहण्याचा जरी बेत केला तरी त्याची प्रिय पत्नी त्यास कशी शोधीत येते हें नारायणावतार श्री नारायण महाराज आपल्या ऐश्वर्यानें प्रत्यक्ष दाखवित आहेत! जेथें नारायण तेथें लक्ष्मी असावयाचीच.

## चमत्कार २ रा.

'जगीं सर्व–सुखी असा कोण आहे' असें समर्थ, मनाला विचारतात व शोध करण्यास सांगतात; तो सर्व सुखाचा ठेवा बढाण्याचे नवद्वीपात आनंद–मूर्ति अशा श्री. नारायण महाराजाचे रूपानें आपणास प्रत्यक्ष दिसत आहे.

## चमत्कार ३ रा.

मातीची चिमुटभर साखर करणें यात मोठेंसें काय आहे? पण अरण्याचें उपवन करणें व निर्जन प्रदेशाचें नगर बनवून तेथें साखरेच्या गोण्या निर्माण करणें हा चमत्कार केवढा बरें? बढाण्याचे नवद्वीपात श्री नारायण महाराजानीं हाच चमत्कार लोकास प्रत्यक्ष करून दाखविला आहे!

## चमत्कार ४ था.

बढाण्याचे नवद्वीपात सानेटरी बोर्ड नाहीं, ग्राम पंचायत नाहीं, कीं म्युनिसिपालिटी नाहीं, पण स्वच्छता इतकी वर्णनीय आहे कीं, उभ्या नगरात कोणत्य ही वेळीं कोठेंहि फिरून पहा, कैर कचरा असा तुमचे दृष्टीस पडणार नाहीं.

## चमत्कार ५ वा.

मोठमोठ्या शहरातून सरकारी नगररक्षक रात्रीं पाहारा करीत असतात. किर्लोसकर वाडी, ओगले वाडी वगैरे नमुनेदार वसाहतींत स्वयंसेवक पाहारा करितात. पण इतकें करूनही चोऱ्या व्हावयाच्या त्या होतातच. बढाण्याचे नवद्वीपात एकही नगररक्षक नाहीं; परंतु येथें चोरी

क्र. ३५८८(२१)

अगर दरोडा, याची कल्पना सुद्धा नाहीं! अंधारीच्या दृष्टीपुढें जसे डोळे दिपतात, तसे सत्पुरुषांच्या दिव्य तेजापुढें चोर, दरोडेखोर वगैरे दिपून जणू काय आंधळेच होतात!

## चमत्कार ६ वा

आपले घरीं शें पन्नास पान होणारा लहानसाच समारंभ असला तरी कोण घाई उडते! आचारी मिळत नाहीं, वाढण्याची पंचाईत व अंदाजाबाहेर पान झालें तर पदार्थांस तोटा! अशा एक ना दोन, अनेक अडचणी येतात पण या वढाण्याच्या नवद्वीपात प्रत्यहीं वेळेस दोन अडीचशें पान होत असतां यापैकीं कांहींच अडचण भासत नाहीं! येथें पगारी नोकर असा एकही मनुष्य नाहीं. स्वयंपाकी, वाढपी, व्यवस्थापक वगैरे सर्व बिनपगारी! रस्त्याची झाडलोट करणारेसुद्धा बिनपगारी! पण असें असून हीं सर्व कामें इतकीं व्यवस्थित होतात कीं, प्रत्येक नोकर स्वतःचे जिवाची काळजी घ्यावी तशी आपापले कामाची काळजी घेतांना दिसतो!

## चमत्कार ७ वा

न्याय व आत्म–संरक्षण याचे बाबतींत सरकारची गरज लागत नाहीं असा एखादा गांव आपण दाखवूं शकाल काय? आपणांस माहीत नसेल तर आम्ही सांगतों. असा गांव वढाण्याचें नवद्वीप होय. या नगरीचे संस्थापनेपासून आज तागायत दिवाणी अगर फौजदारी, कोणत्याच प्रकारची फिर्याद सरकाराकडे गेलेली नाहीं व पोलीसची मदतही मागावी लागली नाहीं. हा चमत्कार लहानच काय? असे अनेक चमत्कार या नवद्वीपांत प्रत्यक्ष दिसत असतां त्यास चमत्कार न म्हणणें हाच चमत्कार होय! एक दिवस सूर्यग्रहण किंवा चंद्रग्रहण झालें तर तो चमत्कार मानतां पण अमावास्येच्या दिवशीं नित्य खग्रास चंद्रग्रहण होत असतां व रोज रात्रीं बारा तास खग्रास सूर्यग्रहण होत असतां त्याला आपण कांहींच चमत्कार समजत नसाल तर खरोखरच आश्चर्य आहे. एखादा

गारुडी हातात माती घेऊन फुकर घालतो व 'देखो मट्टीकी शक्कर बनाता हूं' असें ह्मणून साखर करून दाखवितो, या गोष्टीस आपण चमत्कार ह्मणतों व गारुड्याची तारीफ करतों. पण ती साखर लोकांस खाण्याचे कामीं कितीशी उपयोगी पडते? गारुड्यानें केलेल्या साखरेच्या पोतीं बाजारात विक्रीस ठेवलेलीं आढळतात काय? '**बोलाचीच कढी बोलाचाची भात खाऊनियां तृप्त कोण झाला?**' ज्या चमत्काराचा जनतेस कांहीं उपयोग नाहीं ते चमत्कार काय कामाचे? श्री नारायण महाराजांनीं असले दिखाऊ चमत्कार न दाखविता जनतेच्या कल्याणाचेच चमत्कार दाखविले यातच त्याचा खरा संतपणा दिसून येतो.

---

# प्रकरण ६ वें.

## मूळ आणि कूळ

'वासुदेवं नमस्यंति । वसुदेवं न वै जनाः ॥'

नदीचें मूळ व ऋषीचें कूळ शोधूं नये अशी ह्मण आहे पण ही ह्मण कां पडली? त्या गोष्टींचा शोध लागणार नाहीं ह्मणून शोधू नये, असें कोणी ह्मणेल, पण या ह्मणण्यानें कोणीही झाला तरी त्याच्या मनाचें समाधान होईल असें नाहीं. कारण सशोधक प्रयत्न करील तर तो नदीचे उगमाचा शोध लावील व अनेक ऋषींच्या आद्य्या पणआचीही माहिती मिळवील. मग हा शोध करु नये हें सांगण्याचें कारण निराळेंच असले पाहिजे हे उघड आहे. त्या सशोधनात श्रमाचे मानानें लाभ नाही इतकेंच नव्हे तर लाभापेक्षा हानीच जास्त व आनंदाऐवजी खेद होण्याचा संभव! असले शोध करण्यात अर्थ नाहीं हा वरील ह्मणीचा हेतु आहे. अशा शोधात एकादवेळ लाभ होईल व आनंदही वाटेल व पुष्कळ वेळ

याचे उलट प्रकार होईल. मनुष्याचा बीज-प्रद पिता शोधून काढण्याचें जर एकादें यत्र निघालें तर त्यापासून कांहीं लाभ होतील हें खरें पण लाभापेक्षा हानीच जास्त होईल. अनेक मुलांची मातृभक्ति नष्ट होईल, पतिपत्नींच्या प्रेमाचा नाश होईल, गृहकलह वाढतील, विवाह प्रसगीं अडचणी उद्‌भवतील व समाजात चिंतेचें साम्राज्य पसरेल! तेव्हा अशा प्रकारचे शोध करणें अयोग्यच होय. शिवाय व्यक्तीची योग्यता केवळ उत्पत्तीवरून ठरणारी नसून गुणावरूनच ठरणारी आहे. व्यास, धर्म व वाल्मिकी या महाभागाची योग्यता त्यांच्या जातकुळीवरूनच ठरली नसून त्यांचें तप, ज्ञान व अलौकिक सामर्थ्य यावरूनच ठरली आहे हें लक्षात ठेवलें पाहिजे. जातकुळी मनुष्याविषयीं आदर उत्पन्न करीत नसून मनुष्याचें कर्तृत्वच त्याच्या जातकुळीविषयीं आदर उत्पन्न करितें व तिला शोभा आणतें. भगवान् वासुदेवाला लोक वदन करितात पण त्याच्या पित्याला ह्मणजे वसुदेवाला वदन करीत नाहींत, यावरूनही हाच अनुभव येतो. अपरिपक्क विचाराच्या मनुष्यास व्यास, धर्म व वाल्मिकी याची उत्पत्ति सागितली तर ते त्या पूज्य विभूतींची निंदा मात्र करीत सुटतील! '**दैवायत्तं कुले जन्म ममायत्तं तु पौरुषं**' असें मनात आणून आपण व्यास वाल्मीकाप्रमाणें मोठें व्हावें अशी महत्वाकांक्षा धरणार नाहींत. नदींचें मूळ शोधण्यात हाच प्रकार आहे. गंगा घ्या, कीं गोदा घ्या, कोणाच्याही मुळाशीं खडक आणि बोटाएवढा पाण्याचा प्रवाह याचाचून काय दिसणार? आणि हें दृश्य त्याचा पूज्यपणा कसा वाढविणार? त्र्यबकेश्वरास गोदावरीच्या मुळाशीं गटारवजा असलेलें पात्र व त्यात पडलेल्या उष्ट्या पत्रावळी आणि आत सोडलेल्या गावच्या मोऱ्या पाहाण्यापेक्षा नाशिकपासून पुढें गोदावरीचें स्वरूप पाहाण्यात गम्मत आहे. नवयौवना कामिनीचें वर्णन कामीजनास जसें आल्हादकारक वाटतें तसें ती बाल्यावस्थेंत आपल्याच मलमूत्रात लोळत असतानाचें दृश्य आल्हादकारक वाटत नाहीं. साराश, ऋषीचें कूळ पाहण्यात व नदीचें मूळ शोधण्यात

मोठासा लाभ नाहीं, तथापि अगदीं मुळापर्यंत न जातां त्याच्या जवळ जवळ जाण्यातही थोडीशी गम्मत आहे. नदीचे मुखाजवळचा देखावा जसा गंभीर तसा उगमाकडे या कड्यावरून त्या कड्यावर उड्या घेणें व हंसणें, खिदळणें असला पोरकटपणाचा देखावाही मनाला रमवितो. ज्याचें नालच्छेदनही झालें नाहीं इतकें लहान मूल उचलून घेण्यात जरी आनंद न वाटला तरी दुड दुड धावणारें गोजिरवाणें बालक उचलून घेण्यात आनंद नाहीं असें कोण ह्मणेल? सारांश, कोणत्याही थोर विभूतीच्या बालपणाकडे कौतुकानें पाहिलें तर मनाला एक प्रकारचा आनंदच होईल. व याच कारणास्तव आह्मीं श्री नारायण महाराजांच्या बालपणची अद्‌भुत कथा पुढें सांगत आहों.

विजापूर जिल्ह्यात बागलकोट ह्मणून तालुक्याचा गांव आहे. याच तालुक्यात शिंदगी नावाचें खेडें आहे. या खेड्यात संति उपनावाचें विश्वामित्र गोत्री यजुर्वेदी ब्राह्मणाचें एक घराणें पूर्वी प्रसिद्ध होतें. या संति घराण्यांत श्री भीमाशंकर संति नावाचें प्रसिद्ध सत्पुरुष झाले होते. याच सत्पुरुषाचे वंशांतील मंडळी पुढे बागलकोटास राहू लागली. बागलकोटाच्या या संति घराण्यात इ. स. १८९१ चे सुमारास श्री नारायण महाराजाचें जन्म झालें. श्री नारायण महाराजाचे वडील भीमराव संति हे मोंगलाईत नोकर होते व चौघे चुलते रामचंद्र, काशिनाथ, श्रीनिवास व नरसिंह हे घरीं असत. गृहस्थितीहि बरी होती पण लवकरच हें पारडे फिरलें. महाराज तीन वर्षांचे होतात न होतात तों त्याचे वडील भीमराव व मातुश्री लक्ष्मीबाई स्वर्गस्थ झाली व घरातील कर्ते पुरुषही कालवश झाले. यामुळें मातृ-पितृ वियोग व दारिद्र्य या कात्रीच्या दोन पात्यांत हें तीन वर्षांचें बालक सांपडलें. अर्थात लहानपणीं या बालकास किती कष्ट झाले असतील याची वाचकानींच कल्पना करावी. श्री नारायण महाराजास यावेळीं त्याचे एक चुलते हे हयात

असल्यामुळें त्याचा थोडासा आधार होता व त्यांना पुढं ३–४ वर्षं त्याच पालन पोषण केलें. पुढें महाराज धारवाड जिल्ह्यांत नरगुदास आजोळीं गेले. नरगुंदचे ' दरेकर उपनावाच्या घराण्यांतली मुलगी महाराजांची आई होती. महाराजांचें उपनयन दरेकर यानींच केलें. उपनयन झाल्यावर तेथें ते फार दिवस राहिले नाहींत. शुकाचार्य मुंजीचे वेळींच पळाले तर महाराज मुंज होताच मनास वाटेल तिकडे वायुवृत्तीनें चालते झाले! पण शुकाचार्य गेल्याबरोबर ' द्वैपायनो विरह कातर आजुहाव पुत्रेति ' त्या-प्रमाणें महाराजास ' पुत्रेति आजुहाव ' या शब्दानीं मागें फिरविण्यास खरें मायेचें माणूस कोणीच नव्हतें! महाराजाचे संचारास आरंभ इ. स. १८९८ चे अखेरीस झाला असावा असा तर्क आहे. नारायण महाराज हें नांव इ. स. १९०३ ते १९०४ या दरम्यान लोकांस ऐकूं येऊं लागलें. अर्थात यावेळीं महाराजाचें वय १२ अगर १३ वर्षांचें होतें पण ही वामन मूर्ती त्यावेळीं ८–९ वर्षांचीच दिसत असे. एवढ्या लहान वयात या बटूला सत्पुरुषपद मिळालें, वर्तमान पत्रांतून प्रसिद्धि झाली व मोठमोठे लोक भजनीं लागले हीच गोष्ट त्याचें विभूतिमत्व सिद्ध करण्याला पुरेशी आहे. ' यद्यद्विभूतिमत्सत्व श्री मदूर्जितमेववा । तत्तदेवाव-गच्छत्वं मम तेजोंश संभवं । ' या भगवद्वाक्यावर ज्याचा भरवसा आहे ते श्री नारायण महाराजास ईश्वरी विभूति मानतील अशी आमची खात्री आहे. महाराजानीं १८९८ चे सुमारास संचारास आरंभ केला व १९०३ ते १९०४ या दरम्यान ते सत्पुरुष या स्वरूपात प्रगट झाले असें मागें सांगितलें; त्यावरून १८९८ ते १९०३ पर्यंत ते जवळ जवळ ४–५ वर्षं अज्ञात स्थितींत संचार करीत होते असे ठरते. हा संचार कोठें कोठें झाला व तो कशा स्वरूपाचा होता हें कळण्यास मार्ग नाहीं. आम्हीं या संबंधानें महाराजास विचारलें नाहीं, कारण विचारून उपयोग होईल असें आम्हास वाटलें नाहीं. महाराज वायुवृत्तीनें फिरणारे, त्यांना हा भाव

कोणता व पुढला कोणता याचा तपास करण्याची थोडीच गरज होती!! मग अशा वृत्तीच्या अवलियास प्रश्न करून तरी उपयोग काय? श्रीयुत काटकर यांनीं महाराजाचें लहानसें चरित्र प्रसिद्ध केलें आहे त्यात त्यांनींही महाराजाकडून काहीं माहिती मिळत नाहीं असें लिहिलें आहे, काटकरास महाराजांचा सहवास बराच असावा असें त्याचे लिहिण्यावरून दिसतें तथापि त्यानाही महाराजाकडून काहीं माहिती मिळाली नाहीं मग ती आह्मास तरी कशी मिळणार?

वरील ४–५ वर्षांच्या अज्ञातवासात महाराज अनेक ठिकाणीं गेले असावे; नगर जिल्ह्यातील एक वृद्ध गृहस्थ 'महाराज नऊ वर्षे वयाचे असताना आपण पैठणास पाहिले होते असें मजपाशीं बोलले; दुसरे पुणें जिल्ह्यातील मोर गावचे एक हरदासबुवा सध्या गोरक्षण संस्थेत आहेत ते ह्मणाले कीं, महाराज लहानपणीं आमचे गावीं होते व मधुकरी मागत असत! कोणी त्यास मुंबईस पाहिलें ह्मणतात तर कोणी पुण्यात पाहिलें ह्मणतात. कोणी नाशिकास होते म्हणतात तर कोणी औदुंबरास होते असें सांगतात!! कोणीं कोठेंही पाहू, महाराज संचार करीत होते एवढें मात्र अगदीं सत्य आहे. संचारातील दिनचर्या कळण्यास मात्र मार्ग नाहीं. महाराज अज्ञातवास संपवून प्रथम पुण्यास प्रगट झाले व तेथे एका गृहस्थाकडे विद्याभ्यास करण्यासाठीं म्हणून राहिले अशी माहिती मिळते. हे पुण्याचे गृहस्थ कोण होते याचा आम्हीं बराच तपास केला पण नाव कळलें नाहीं. त्याचे संबंधानें एवढेंच कळलें कीं, ते भिक्षुक वृत्तीचे गृहस्थ होते व महाराजास आश्रय देण्यात त्यांचा हेतु एक बेवारशी मुलगा फुकटचा नोकर होईल हाच होता! अर्थात् या ठिकाणीं महाराजाचा विद्याभ्यास होणे शक्य नव्हतें व महाराजही त्या ठिकाणीं फार दिवस राहिले नाहींत यावरून वरील माहिती खरी असावी.

महाराजानीं पुण्यातून पाय काढला व त्याच जिल्ह्यातील श्रोपगांव

नावाच्या खेड्यात ते प्रगट झाले. गोपगावानंतर महाराजाचा अज्ञातवास संपून त्याच्या ज्ञान-रवीच्या किरणच्छटा हळूहळू क्षितिजावर झळकू लागल्या. अरुण जसा हळूहळू सूर्यनारायणास इष्टस्थलाकडे घेऊन जातो त्याप्रमाणें या उदयोन्मुख नारायणासही गोपगावीं एक अरुणसदृश सारथी भेटला! या सारथ्याची प्रथम थोडीशी हकीगत सांगून मग पुनः मुख्य विषयाकडे वळू.

त्र्यंबकराव कुळकर्णी नावाचे एक भाविक वृद्ध गृहस्थ होते, हे गोप-गावचेच राहणारे. पण महाराज गोपगावीं गेले तेव्हा त्र्यंबकरावाचें वास्तव्य पुणें जिल्ह्यातील दौंड जवळ आर्वि नावाचे खेड्यात होते. त्र्यंबकरावाचे पत्नीस काहीं पैशाचिक उपद्रव झाल्यामुळें त्याचे निरसनार्थ ते पत्नीसह 'आर्वि' येथें श्री मुद्गलेश्वराची सेवा करीत राहिले होते. रोज भिक्षान्न सेवन व एकनिष्ठपणें ईश्वरसेवा या तपानें त्याची पत्नी व्याधिमुक्त होऊन पूर्ण बरी झाली होती. तथापि ते भगवद्भक्ति व सत्पुरुष समागम याचा आनंद अनुभवीत बहुतेक आर्वीसच राहात असत. कारणपरत्वें ते गोपगावींही येत जात. महाराज गोपगावीं गेल्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्र्यंबकराव काहीं कामासाठीं आपल्या गावीं आले असता श्री नारायण महाराजाची आनंदी वामन मूर्ति त्याचे दृष्टीस पडली व तीवर त्याचें प्रेम जडलें त्यानीं हा मुलगा कुठला, कोण याची चौकशी केली व त्या चौकशींत तो निराधार आहे असें त्यास समजलें. त्र्यंबकरावास मुलगा नव्हता. कन्या संतति होती पण त्याचीं लग्नें झाल्यामुळें त्याहि त्याच्या जवळ नसत. यामुळेंच विशेषतः या निराश्रित मुलाकडे त्याचें चित्त वेधलें व ते त्याकडे पुत्रभावानें पाहूं लागले. महाराजानींही त्र्यंबकरावाकडे पितृभावानें पाहिलें. मग काय विचारतां? बाळा, मजबरोबर आर्वीस येतोस काय? असें त्र्यंबकरावाचे मुखांतून येताच 'होय,' असें महाराजाकडून उत्तर मिळालें. या उत्तरानें त्र्यंबकरावास किती आनंद झाला असेल याची

कल्पना पुत्रेच्छु मनुष्यासच स्वानुभवानें होईल; इतरांस होणार नाहीं. मग त्र्यंबकरावांनीं लगेच हें पुत्र-रत्न आवींस आणलें.

जो मुलगा ४-५ वर्षे भटकण्यांत आनंद मानीत होता, जो सर्वत्र अनासक्तपणें वायुवृत्तीनें वागत होता व जो पुण्यास आश्रय मिळाला असतां तेथेंहि रमला नाहीं, तो त्र्यंबकरावाकडे पितृभावानें कसा पाहू लागला? खरोखरच ही गोष्ट आश्चर्याची आहे. अशा चमत्कारिक गोष्टी दृष्टीस पडल्या ह्मणजे मीमांसकासही हात टेंकावे लागतात व शेवटीं 'व्यतिषजति पदार्थानांतरः कोपि हेतुः। न खलु बहिरुपाधीन् प्रीतयः संश्रयन्ते।' या भवभूतीच्या सिद्धांताचाच अंगीकार करावा लागतो. असो. नारायणासारखें पुत्र-रत्न लाभल्यामुळें त्र्यंबकरावांची पत्नी लक्ष्मीबाई हिचा आनंद तर गगनांत मावेना! महाराजही तिला आईप्रमाणें मानूं लागले. याप्रमाणें बालपणचें अपुरें राहिलेलें मातृ-पितृ सौख्य या ठिकाणीं महाराज पूर्ण करून घेऊं लागले. आवींस महाराजांचें शिक्षण वगैरे झाल्याचे दिसत नाहीं. त्यांचा काळ समवयस्क मुलांबरोबर खेळण्या बागडण्यात जात असे. महाराजांचा स्वभाव अत्यंत आनंदी, चेहरा मोहक आणि वर्तन पूर्ण निष्कपटी यामुळें ते आपले संवगड्यास व तेथील सर्व मंडळीस प्रिय झाले यात नवल नाहीं. शिवाय महाराजांवर विशेष प्रेम जडण्यास किंबहुना त्यांच्या ठिकाणीं भक्ति जडण्यास कारणीभूत होणारी अंतर्ज्योतीची प्रभा या ठिकाणीं हळूहळू उदय पावू लागली होती. ते खेळतां खेळतां लीलेनें मुलास कांहीं चमत्कार करून दाखवूं लागले. पण या पोर खेळातील चमत्कारानीं थोरांचेंही चित्त तिकडे वेधलें व हा मुलगा चार चौघाच्या सामान्य मुलाप्रमाणें नसून कांहींतरी विशेष दैवी शक्तीचा आहे असें त्र्यंबकरावास व तेथील सर्व लोकास वाटूं लागलें.

अस्तु. याप्रमाणें आवीं गावात महाराजांनीं आपलें खरें स्वरूप थोडेंसें प्रगट केलें व तें गाव सोडलें. आवींस महाराजांस कशाचीहि

रुणीव नसता तें गाव का सोडलें हें कळत नाहीं. कदाचित् महाराज हल्लीं राहात असलेल्या स्थानाचा भाग्योदय व्हावयाचा होता अथवा खिस्ती पारध्यानीं अजाण, अनाथ व बुभुक्षित लोकास पकडण्यासाठीं, जाळें पसरून ठेवलेल्या केडगावानजीक कोठेंतरी आसपास या सर्व अजाण लोकास आपल्या तपोबलानें आपणाकडे ओढील व धर्मांतरापासून रक्षण करील अशी एक शक्ति स्थापन करावी अशी ईश्वराची इच्छा होती. ह्मणून महाराजाचें आगमन आर्वीहून हल्लींच्या बढाणें गांवचे बेटाला झालें असें ह्मटलें पाहिजे व हेंच खरें. आता असें आहे तरी एका निमित्त कारणाचाही येथें उल्लेख केला पाहिजे तो असा. त्र्यंबकराव आपले भाचे श्रीयुत सदाशिवराव ऊर्फ नानासाहेब देशपांडे याकडे एकदा महाराजास बरोबर घेऊन चार दिवस बढाण्यास राहण्यास गेले; देशपांड्याचें घराणें मोठें असून त्याची सुपें व बढाणें गांवीं मालकीची जमीन होती. नानासाहेब स्वतः बढाण्यास राहात व त्याचे दुसरे बंधु सुप्यास असत. हल्लीं ज्या बेटाचें इंद्रभुवन झालें आहे त्याच बेटात लहानसें शेतघर बांधून नानासाहेब तेथे शेतीभाती करीत असत महाराजास हें एकांत स्थान फार पसंत पडलें व ते त्याच ठिकाणीं रमले. नाना साहेबाची पत्नी उमाबाई हिसुद्धा त्र्यंबकरावाचे पत्नीप्रमाणेंच प्रेमळ बायको होती. यामुळें महाराजास तेथें परकेपणा वाटला नाहीं व महाराजास तेथें ठेवण्यात त्र्यंबकरावासही काळजी करण्याचें कारण नव्हतें. महाराज केव्हा केव्हा आर्वीस जात येत असत. आर्वीप्रमाणेंच बढाण्याचे बेटात देशपांड्याचे घरीं महाराजाचे हातून अनेक चमत्कार होऊं लागले व ती वार्ता हळू हळू बाहेर पसरत चालली. अनेक लोक दर्शनास येऊं लागले, व हे वामनमूर्ति नारायण 'नारायण-महाराज' या पदास पोंचले. बढाण्यास आल्यावर महाराजाची दिनचर्या रोज स्नान, संध्या, भजन व रानात एकांतीं शिलातलावर बसून ध्यान करणें अशी असे. लोक त्यास महाराज ह्मणू लागले पण त्याबद्दल गर्व उत्पन्न होऊन त्याचे वृत्तींत यत्किंचितही फरक पडला नाहीं. बढा-

ण्याचे बेटांत एक औदुंबराचें झाड आहे त्याखालीं महाराजांची तप करण्याची जागा होती. एकदा महाराजांनीं या औदुंबराचे मुळाशीं भूगर्भांत दत्तमहाराज आहेत असें लोकांस सांगून सर्वसमक्ष भूमि उकरून श्रीदत्ताच्या पादुका वर काढल्या! यावेळीं त्या पादुकावर ताजीं पुष्पें वाहून नुकतीच पूजा केलेली आहे असें लोकांस दिसलें व सर्व लोक आश्चर्यानें थक्क झाले, असे सांगतात. या चमत्कारानें महाराजांचें नांव सर्वतोमुखीं झालें व अनेक लोक दर्शनांस येऊं लागले व कित्येक सेवा करण्यास तेथेंच राहू लागले. अर्थात या सर्व लोकांच्या रहाण्याची, उतरण्याची व जेवण्याची व्यवस्था करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली, व हळू हळू या ठिकाणास नगराचें स्वरूप प्राप्त झालें. औदुंबराजवळच पूर्वी पत्र्याची लहानशी झोंपडी होती; आता यात्रेकरूंची संख्या वाढत चालल्यामुळें नवीन प्रशस्त मंदिर व वसतिगृहें बांधणें आवश्यक झालें. त्याप्रमाणें पूर्वीचे ठिकाणापासून थोड्याच अंतरावर सोईची जागा पाहून महाराजांनीं नवद्विप निर्माण करून हल्लीं दिसत असलेली सुवर्णपुरी निर्माण केली आहे. हल्लीं दिसत असलेले भव्य व सुंदर दत्त मंदीर शके १८३५ सालीं पुरें होऊन वैशाख मासीं श्रीदत्ताची स्थापना झाली. अर्चेचा समारंभही फार मोठा झाला होता.

---

# प्रकरण ७ वें

## दिनचर्या

कोणत्याही प्रसिद्ध व अलौकिक पुरुषाचें नांव ऐकलें व त्याचीं अद्‌भुत कृत्यें पाहिलीं ह्मणजे त्याच्या दिनचर्येकडे मनुष्याचें लक्ष्य साहजिक जातें; राममूर्तीचें राक्षसी सामर्थ्य पाहिलें ह्मणजे तो काय खात

ग्रंथ संग्रहालय ... नं.

असेल, तालीम कशी करीत असेल, त्यानें ही शक्ति कशी संपादन केली. त्याचा गुरू कोण, त्याचें ब्रह्मचर्य कसें आहे, तो केव्हां निजतो, केव्हां उठतो, लहानपणीं त्याची शक्ति कशी होती, शारीरिक बलप्रमाणेच त्याचें बौधिक बल वाढलेलें आहे कीं नाहीं, त्याचे आई बाप सशक्त होते, कीं सामान्य लोकांसारखेच होते, इत्यादि अनेक गोष्टी समजून घेण्याची जिज्ञासा उत्पन्न होते व या जिज्ञासेंत जिज्ञासूच्या आत्मोन्नतीचा हेतु असतो. भगवंतांनीं स्थितप्रज्ञाची महती सांगतांच अर्जुनानें भगवंतास '**स्थित प्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव। स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किं।**' असा प्रश्न केला आहेच, तेव्हां श्री नारायण महाराजांविषयीं कोणीं तसा प्रश्न केल्यास आश्चर्य नाहीं. मात्र एतद्विषयक प्रश्नांचीं उत्तरें देणारा मनुष्य चांगला माहितगार पाहिजे. आह्मास असावी तशी माहिती नाहीं. एक दोन खेपांतील अल्प परिचयानें जेवढें दिसलें व कळलें तेवढेंच आह्मी लिहिणार. पण तेवढ्यावरून स्थालीपुलाक न्यायानें वाचकास बरेंच अनुमान करता येईल असें आह्मास वाटतें. महाराज अगदीं प्रातःकाळीं उठून सर्व विधि उरकून सूर्योदयापूर्वी स्नान आटोपून योग्य संधिकाळीं सूर्यनारायणास अर्घ्यप्रदान करितात. संध्या, जप व ध्यान आटोपल्यावर नऊ वाजण्याचे सुमारास श्रीदत्ताचे दर्शनास जातात. नंतर दर्शनास आलेल्या भक्तजनास दर्शन देतात. हें दर्शनाचें काम जवळ जवळ बारा वाजेपर्यंत चालतें; नंतर महाराजांचें भोजन होतें. महाराजांचा आहार अल्प असून ते अगदीं सात्विक अन्न सेवन करितात. त्यास फळांची आवड जास्त आहे. भोजनोत्तर सायंकाळचे साडेपांच वाजेपर्यंत ते झोंप घेतात, नंतर सायंसंध्या आटोपून पुनः दत्त दर्शनास जातात व तेथून परत आल्यावर आपल्या भक्त मंडळीस दर्शन देतात. रात्रीं रोज भजन होतें. भजन झाल्यावर कथा, पुराण अगर दुसऱ्या कांहीं गोष्टी व्हावयाच्या असल्या तर त्या होतात. भक्त-

जनाशीं संभाषण व त्यास आशीर्वाद देण्याची ही रात्रीची. शांत वेळा असते दिवसाही ते भक्तजनाशीं संभाषण करतात. पण दिवसा नित्य-कर्मांत वेळ फार जातो आणि झोंपेंतही चार तास जातात, यामुळें रात्रींच संभाषण करण्यास स्वस्थपणा मिळतो. रात्रींचे जागरणाची महाराजास सवय पडून गेली आहे, यामुळें ते सारी रात्र जागले तरी त्याची प्रकृति बिघडत नाहीं; मात्र दिवसा झोंप न मिळाली तर प्रकृति बिघडते ह्मणतात! आमचे मतें हा सवईचा प्रकार असावा. महाराज कधीं कोणाशीं वाद-विवाद घालीत नाहींत, प्रापंचिक काथ्याकूट करीत नाहींत, कीं कोणावर रागवत नाहींत, यामुळें त्यांची आनंदवृत्ति सदा कायम राहते. महाराजांनीं क्रोध जिंकला आहे पण तो त्यास कसा जिंकता आला? याचें मर्म भगवताचे पुढील वाक्यांत आहे 'कामएष क्रोधएष रजोगुण समुद्भवः' याचा अर्थ कामच इच्छा पूर्ण न झाल्यामुळें क्रोध रूपानें प्रगट होतो. जेथें काम आहे तेथें क्रोध आहे व जेथें काम नाहीं तेथें क्रोधही नाहीं हा सिद्धांत आहे. महाराज पूर्णकाम असल्यामुळें कामास क्रोध रूपानें प्रगट होण्यास कारणच राहात नाहीं. दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे ती ही कीं, महाराज जरी एकाद्या संस्थानिकाप्रमाणे ऐश्वर्य भोगीत आहेत असें दिसतें, तरी ते त्या ऐश्वर्यास चिकटून नाहींत व ह्मणूनच ते सदोदित आनंदी दिसतात. राजे रजवाड्यांची गोष्ट तशी नसते, ते वैभवास चिकटून असतात यामुळें वैभव कसें टिकेल या चिंतेत त्यांचा आनंद नष्ट होतो. महाराज बालपणापासूनच विषयाविषयीं अनासक्त असून वायुवृत्तीनें वागत होते हें मागें सांगितलें आहेच. विषयोपभोग एकापुढें एक अनर्थपरंपरा उत्पन्न करून शेवटीं मनुष्याचा नाश करितात.

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ।
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोभिजायते ॥
क्रोधात् भवति संमोहः संमोहात्स्मृति विभ्रमः ।
स्मृति भ्रंशात् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥

असें भगवान् सांगतात. मग श्री नारायण महाराज या राजभोगाची संगति का करितात असे आक्षेप पुष्कळ लोक घेतात पण त्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, या अनर्थ परंपरेचा आरंभ विषयाचें ध्यान हाच आहे. ध्याना-नंतर मनुष्य त्याची संगति करितो व पुढील सर्व अनर्थ भोगण्यास पात्र होतो. महाराज विषयाचें ध्यान करून त्याची संगति करतात अशातला मुळींच प्रकार नाहीं. विषयच महाराजाचें ध्यान करतात व त्याना चिकटून बसतात, त्याला महाराज काय करणार? कोणी ह्मणेल महाराजांनीं त्या ऐश्वर्याचा त्याग करावा, पण त्याग करून विषयांनीं महाराजास सोडलें नाहीं तर महाराज काय करणार? आह्मास दारिद्र आवडत नाहीं, आह्मीं त्याचें कधीं ध्यानही केलें नाहीं, पण दारिद्रास आह्मीं फार प्रिय असल्यामुळें तें आह्मास चिकटून बसलें आहे. आह्मीं त्यास घालविण्याचा यत्न करितों पण व्यर्थ. नारायण महाराजाची अशीच स्थिति झाली आहे. शिवाय जसें 'मा कर्मफल हेतुर्भू' तसें 'मा ते संगोस्त्व कर्मणि' असे भगवतांनीं सांगितलें असल्यामुळें विषयांस भिऊन दूर पळणें हेंहि अयोग्य आहे. जेथें ध्यानच नाहीं तेथें तज्जन्य अनर्थही नाहींत. आता विषयच महाराजाचें ध्यान करितात असें आह्मीं म्हटलें आहे त्यावरून विषय ध्याते असल्यामुळें त्यास ही अनर्थपरंपरा भोंवेल व शेवटीं त्याचा नाश होईल. महाराज ध्येय वस्तु असल्यामुळें ती नेहमीं निर्विकारच राहणार. सारांश 'लक्ष्मीः समा विशतु गच्छतु वा यथेष्टं' अशा वृत्तीच्या पुरुषानीं लक्ष्मीला भिऊन दूर पळण्याचें कारण नाहीं; तिच्याशीं खुशाल क्रीडा करावी.

श्रीनारायण महाराजाचें उपास्य दैवत श्रीदत्त आहे. ते श्रीदत्ताचें भजन पूजन करीत असतात पण 'आदौ स्ववर्णाश्रम वर्णिताः क्रियाः' हें धर्मतत्व ते विसरलेले नाहींत. स्ववर्णोचित नित्य कर्मास फाटा देऊन केवळ नामस्मरणानेंच मोक्ष मिळतो असें सांगणारे कित्येक सांप्रदायिक

सद्गुरु आम्हा पाहिले आहेत पण श्री नारायण महाराज स्ववर्णाश्रम धर्मांचें परिपालन एकनिष्ठपणें करीत असतात. गायत्री मंत्राचें ध्यान हें महाराजाचें मुख्य व्रत आहे. दर चातुर्मासात ते गायत्री पुरश्चरण करतात! महाराजांची अर्घ्यप्रदानाची वेळा बहुधा कधींच चुकत नाहीं. पण एकाद वेळ चुकलीच तर ते त्या दिवशीं उपोषण करितात! यावरून 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः' या भगवद्वाक्याचें परिपालन ते किती उत्कृष्ट करितात याचें अनुमान होतें. महाराज स्वकर्मनिरत असल्यामुळेंच त्यास जनकादिकाप्रमाणें सिद्धि प्राप्त झाली आहे. श्री नारायण महाराजाचें अनुकरण स्नान संध्येच्या बाबतींत सर्व ब्राह्मणांनीं व त्यातही विशेषतः वैदिकानीं केलें तर त्याची तेजस्विता वाढेल अशी आमची खात्री आहे.

---

# प्रकरण ८ वें.

## शोध आणि बोध.

केवळ मोठमोठे ग्रंथ बाळगल्यानेंच विद्वत्ता येत नाहीं व अनेक औषधींचा संग्रह केल्यानें आरोग्य व जीवित संरक्षिलें जात नाहीं. साधनें जवळ असून त्याचा उपयोग करण्याची माहिती नसेल तर साध्याची प्राप्ती होणार नाहीं. साध्याची सिद्धि होण्यास साधनांचा उपयोग करण्याची माहिती पाहिजे व योग्य रीतीनें त्याचा उपयोग केला पाहिजे. पुस्तक-संग्रहालयातील झाडलोट करणारा नोकर रोज अनेक ग्रंथाची उलथापालथ करतो व लोकास पुस्तकें देतो पण स्वतः त्यास त्या पुस्तकातील विषयाची काहींच माहिती नसते. अर्थात या ज्ञान-मंदिरात राहून दरमाहा

दोहा पाच रुपड्या मिळविण्या पलीकडे तो कांहींच करीत नाहीं. सत्पुरुषाचें दर्शन घेऊन अगर त्याचे सान्निध राहून जर मनुष्य आत्मोन्नतीचे साधनाचा तेथें शोध करणार नाहीं व बोध घेणार नाहीं तर पाठीवरून साखरेच्या गोण्या वाहणाऱ्या बैलाप्रमाणेंच तो एक भारवाहक ठरेल. बडाण्याचे नवद्वीपात जाऊन काय करावयाचें ? काय ! तेथील नुसत्या इमारती पाहून व महाराजाचें दर्शन घेऊन मार्गे फिरावयाचें, कीं तेथील धर्मशाळेंत जावयाप्रमाणें आतिथ्य भोगीत व फुकटचें भुक्तिसुख घेत पडून राहावयाचें! एवढेच उद्देश असतील तर बडाण्याचे नवद्वीपात जाण्यात अर्थ नाहीं. बडाण्यातील इमारती मुंबईतील इमारतीपेक्षा मोठ्या नाहींत व महाराजाचें स्वरूपही सामान्य मनुष्याहून विलक्षण नाहीं. मग तेथें जाण्यात काहींतरी विशिष्ट हेतु असला पाहिजे, हें उघड आहे. सत्पुरुषाचें दर्शन घेण्यात पारमार्थिक दृष्टीस जास्त प्राधान्य दिलें पाहिजे हें खरें; पण अशा बुद्धीनें दर्शनास जाणारे लोक विरळाच सांपडावयाचे. कोणी पोटशूळ झाला ह्मणून सेवा करितो तर कोणी मूल होत नाहीं ह्मणून सेवा करितो! कोणी मूल वाचत नाहीं ह्मणून सेवा करितो, तर कोणी लग्न व्हावें ह्मणून सेवा करितो ! कोणी नोकरी करिता आशिर्वाद मागतो तर कोणी प्रमोशन व्हावें ह्मणून कृपेची इच्छा करितो ! कोणी व्यापारात फायदा व्हावा ह्मणून सेवा करितो, तर कोणी वादात जय व्हावा ह्मणून उपासना करतो! एकूण बहुतेक ऐहिकाचेच मागें लागलेले आढळतात. कित्येक ऐदी मंडळी कोठें तरी विनश्रमानें निर्वाह व्हावा ह्मणून तेथील आतिथ्याची अपेक्षा करितात असें आढळतें. केवळ परमार्थ साधण्याकरिता चित्तशुद्धिसाठींच सेवा करणारा भाग्यशाली, हजारात एकादाच. यास्तव ऐहिक सुखाकरिता जे लोक येथें येतात त्यांनीं येथें आत्मोन्नतीची दृष्टि कशी ठेवावी हें सांगितलें पाहिजे. सात्विक, राजस व तामस असे तीन प्रकारचे लोक जगांत आहेत. ज्या गुणानें जो मनुष्य युक्त असतो

त्या गुणाचें एक वलय त्याच्या सभोंवार उत्पन्न होतें. गुणाच्या कमजास्त मानानें हें वलय लहान मोठें असतें. या वलयात जे लोक सांपडतात त्यांच्यावर त्या त्या गुणाचा कांहीं तरी परिणाम घडतोच घडतो सत्पुरुषाचे ठिकाणीं सत्वगुणाचा उत्कर्ष झालेला असल्यामुळें त्याचे सभोंवार सत्वगुणाचें तजोवलय फार मोठें उत्पन्न होतें, व या वलयांतील सत्वगुणाचे किरण फार शक्तिमान असतात, यामुळें अशा वलयात रजोगुणी व तमोगुणी मनुष्य आला तर त्याच्यावरही या सत्वगुणाच्या प्रखर किरणांचा परिणाम होतो. या वलयांत आलेले पुरुष आपापल्या गुणाचीं वलयें निर्माण करीत असतातच; पण त्यांचा परिणाम सत्व-गुणाच्या उत्कर्षामुळें सत्पुरुषावर मात्र होत नाहीं. सत्पुरुषाच्या सत्व-गुणाचाच परिणाम त्या रजोगुणी व तमोगुणी पुरुषावर होऊन ते हळू हळू सत्वगुणी बनतात. गंगेस शहरातील अनेक गटारें मिळतात पण तीं तिला अपवित्र करू शकत नाहींत, उलट तींच पवित्र होऊन गंगेबरोबर गंगाजळींत बसून पूजार्ह होतात हें आपण पाहतों. यावरून सत्पुरुष समागमाचें केवढें महत्व आहे हें लक्षात आणावें. बढाण्याचे नवद्वीपात हीच गोष्ट प्रधान आहे. महाराजाच्या सत्वगुणाचें तेजोवलय सर्व नव-द्वीपभर पसरलेलें असल्यामुळेंच मागील प्रकरणात सांगितल्याप्रमाणें नोकर चाकरांवाचून सर्व कामें व्यवस्थित होतात, कोर्टांत जाण्याचे प्रसंग येत नाहींत, पोलीसची गरज लागत नाहीं व सर्व सुव्यवस्थित आणि प्रेमानें काम होतें. यावरून सत्वगुणाचें बळ केवढें असतें याचा प्रत्येकानें बोध घेतला पाहिजे. येथील धर्मशाळेचे द्वारावर एक सूचना-फलक आहे त्यावरील भाषापद्धति पाहा, म्हणजे येथें लिहिण्यांतही किती मार्दव आहे तें कळेल. त्या फलकावर कोणी अयोग्य वर्तन करील तर त्यास हद्दीचे बाहेर पाठविण्यात येईल असें म्हटलें आहे, घालविण्यांत येईल अगर हांकून देण्यांत येईल असली उद्धट भाषा वापरलेली नाहीं अगर म्हटला

करण्यात येईल असली पोलिशी धमकी नाहीं. सारांश येथें सर्वत्र बिनव्याचें साम्राज्य आहे. येथील कामकाजाची व्यवस्था व आस्था पाहून प्रत्येक प्रापंचिकानें आपला प्रपंच सुधारावा. येथील गांवची स्वच्छता पाहून शहरातील म्युनिसिपल अधिकाऱ्यांनीं बोध घ्यावा. येथील बिनपगारी नोकरांची कळकळ पाहून राष्ट्रीय स्वयंसेवकांनीं धडा घ्यावा. व स्वराज्य कसें चालवावें हें शिकण्यास आमच्या पुढाऱ्यांनीं कांहीं दिवस येथे यावें तसेंच ब्राह्मणांनीं आपले ठिकाणीं तेजस्विता येण्यास काय केलें पाहिजे हें समजून घ्यावयाचें असेल, तर त्यांनीं महाराजांची दिनचर्या आपले समोर ठेवावी व परमार्थ साधकांनीं महाराजांची असंगवृत्ति व अयाचित योगक्षेम पाहून आपलें कल्याण करून घ्यावें.

---

# प्रकरण ९ वें

## ब्रह्मापि तं नरं न रंजयति.

तुम्हीं एकाद्याला चांगला म्हणा कीं त्याला लगेच वाईट म्हणणारा दुसरा कोणीतरी निर्माण होतो हा नेहमींचा अनुभव आहे. याप्रमाणें दोन पक्ष झाले कीं, तो चांगला कीं, वाईट हा निर्णय न झाल्यामुळें संशयांत पडलेला असा एक तिसरा पक्ष निर्माण होतो. या प्रमाणें मित्र, शत्रु व उदासीन असे तीन पक्ष जेथें तेथें दिसतात. पण असें कां व्हावें ? जें एकाला चांगलें दिसतें तें दुसऱ्याला वाईट कां दिसावें ? व तिसऱ्याला चांगलें वाईट याचा निर्णय कां होऊं नये ? अशी शंका येते व हा मनुष्याच्या बुद्धीचा दोष कीं वस्तूचा ! असा प्रश्न उपस्थित होतो. '**नासतो विद्यते भावो, नाभावो विद्यते सतः**' हा सिद्धांत आहे. तेव्हां जें चांगलें तें कधींच वाईट होणार नाहीं, व जें वाईट तें कधीं चांगलें होणार नाहीं

हें खरें आहे. पण मग अनुभव उलट कां येतो असें कोणी ह्मणेल तर त्याचें उत्तर असें कीं, आपण त्या वस्तूवर जे बरे वाईट आरोप करितों तेच खरे नसतात. वस्तु बरी नसते अगर वाईटही नसते. आपण तिजवर आरोप करून तिला बरी अगर वाईट करीत असतों असेंच ह्मणावें लागतें व याच कारणानें सुख–दुःख, चांगलें–वाईट, शीत–उष्ण इत्यादि सर्व द्वंद्वांना व्यभिचार आहे ह्मणूनच भगवंतानीं या द्वंद्वांस आगमापायि व अनित्य असें गीतेंत ह्मटलें आहे. सत्ता दोन प्रकारची असते एक व्यावहारिक व दुसरी पारमार्थिक. पारमार्थिक सत्तेस व्यभिचार नसतो पण व्यावहारिक सत्तेस असतो. व्यावहारिक सत्ता परमार्थांत टिकत नाहीं. परमार्थांत सत् व असत् इत्यादि द्वंद्वच नाहीं. जें आहे तें ' सदसतः परं ' आहे. सारांश पारमार्थिक दृष्ट्या बरें–वाईट अथवा साधु–असाधु इत्यादि सर्वच खोटें होय. तथापि आपण सर्व व्यावहारिक पडल्यामुळें बऱ्या वाईटाचा विचार व्यावहारिक दृष्टया केला पाहिजे. व्यावहारिक दृष्टि अथवा व्यावहारिक बुद्धि गुणभेदानें भिन्न भिन्न असते यामुळें जें एकाला वाटतें तें तसें दुसऱ्याला वाटत नाहीं. धर्मराज वाईट मनुष्य शोधण्यास गेला व सुयोधन चांगला मनुष्य शोधण्यास गेला पण दोघेही हात हालवीत परत आले! धर्मास वाईट मनुष्य कोणीच आढळला नाहीं व दुर्योधनास चांगला आढळला नाहीं. यावरून तेथें कोणी वाईट अथवा चांगले मनुष्यच नव्हते असें ह्मणतां येणार नाहीं. धर्म व दुर्योधन यांच्या परमावधीस पोंचलेल्या दोन प्रकारच्या भिन्न बुद्धींचीं हीं उदाहरणें आहेत. पण हीं उदाहरणें सामान्य व्यवहारात उपयोगी पडत नाहींत. तर्क, अनुभव आणि युक्ति यांचे साह्यानें सामान्य व्यवहारांत खरें खोटें, व बरें वाईट याचा निवाडा करावयाचा असतो. खऱ्याखोट्याचा झगडा सामान्य वस्तूविषयीं किंवा सामान्य मनुष्याविषयींच असतो असें नाहीं तर तो देव, दानव, मानव सर्वांविषयीं सारखाच असतो! रामकृष्णास देव

भजणारे हजारों लोक असले तरी त्याचें देवत्व मान्य नसलेले कांहीं लोक होतेच! तुकारामास साधु मानणारे अनेक लोक होते पण त्यांची निंदा करणारेही अनेक होते. निंदकांनीं तुकारामाचा छळ केला, साक्रेटिसास मूठमाती दिली, व ख्रिस्तास सुळावर चढाविलें! सारांश चांगलें व वाईट याचें साहचर्य व्यवहारात सदैव असावयाचेंच. आज श्रीनारायण महाराजांविषयीं हाच प्रकार आढळतो! आह्मीं अनेकांचे तोंडून महाराजांविषयीं अनुकूल प्रतिकूल गोष्टी ऐकल्या होत्या पण या गोष्टींनींच आम्हास महाराजाचे दर्शनाची इच्छा झाली. महाराजाचें प्रत्यक्ष दर्शन होऊन तेथील सर्व व्यवस्था पाहिल्यानंतर आम्हास प्रतिकूल टीकाकाराचे धाष्टर्याचें, मिथ्या भाषणाचें व कुत्सित बुद्धीचें आश्चर्य वाटलें व अनुकूल टीकाकारांचे भोळेपणाचीही थोडी मौज वाटली. प्रतिकूल टीकाकारांत तीन प्रकारचे लोक आढळले ( १ ) केवळ टवाळ ( २ ) केवळ लोकवार्तेवर भरवसा ठेवणारे ( ३ ) व एखाद्या भोंदु-गुरुबोवानें फसविलेले. अनुकूल टीकाकारात दोन प्रकार दिसले ( १ ) चिकित्सक बुद्धीचे श्रद्धाळू व ( २ ) अंध भक्तीचे श्रद्धाळू. वरील वर्गांपैकीं 'टवाळ लोक' हे 'ब्रह्मापि तं नरं न रंजयति' या मासल्याचे खप्पी असतात. या लोकांच्या टवाळीचा मासला आह्मी देत आहों. नुकतेच एरंडोल येथें श्रीमाधवनाथ महाराज गेले होते व त्यावेळीं आमचा मुक्काम तेथून १४ मैलावर धरणगावीं होता. नाथमहाराजाचे दर्शनास धरणगावाहून शेंकडों लोक गेले होते. आह्मीं त्यास तेथील समारंभाची हकीकत विचारली तेव्हा कित्येक ह्मणाले नाथमहाराजाचें दर्शन घेण्यास पांच रुपये फी ठेवली आहे. श्रीमंत व अधिकारी लोकास दर्शन अगोदर होतें, इतरास मागाहून! श्रीमंतास प्रसादाची खडीसाखर मूठभर मिळते पण गरीबास एक खडाच! नाथमहाराजांस एका परातींत बसवून स्नान घालतात व

तें पाणी ऊर्फ आगवणी तीर्थ ह्मणून देतात! भक्ताची गर्दी फार झाल्या-मुळें परवा तीर्थास तोटा आला; महाराजाचीं वस्त्रें पिळून तीर्थ देण्यात आलें तरीही भागेना तेव्हा महाराजानीं एक गुळणा करून हौदात टाकला व तें पाणी तीर्थ ह्मणून देण्यात आलें! याप्रमाणें अनेक प्रकारची माहिती लोक सांगू लागले. आह्मीं आश्चर्यचकित झालों पण पुढें दुसरे दिवशींच आह्मीं प्रत्यक्ष एरंडोलास जाऊन सर्व प्रकार पाहिला तेव्हा वरील हकी-गतींत सत्याचा लवलेशही नाहीं असें दिसून आलें. साराश ज्याचा टवाळी-चाच स्वभाव आहे त्यास एखादी गोष्ट समजून सांगितली तरी त्याची सम-जूत पटणार नाहीं. आता टवाळ लोकानीं टवाळी केली तर खन्या सत्पुरुषाची लाभ हानी काहींच नाहीं हें खरें पण विनाकारण लोकाचा बुद्धिभेद होतो. कांहीं भोंदू वरील टवाळीचे वर्णनास अक्षरशः पात्र आहेत इतकेंच नव्हे तर त्याची मजल याच्याही पुढें गेलेली असते हें खरें पण तेवढ्यावरून खऱ्यासही खोट्याचे पंक्तींत बसविणें योग्य नाहीं. आह्मास भोंदु गुरूबद्दल आदर नाहीं व केवळ अंध श्रद्धेनें आह्मीं कोणाचे चेले होणार नाहीं. भोंदु गुरूचा खरपूस समाचार आह्मीं अनेक वेळ घेतला आहे. एका भोंदु गुरूबद्दल आह्मीं किती स्पष्ट लिहिलें होतें याचा थोडासा भासला ह्मणून पुढील ओंव्या वाचाव्या.

## भोंदु गुरुवर्णन.

भोंदु गुरूची मुख्य खूण। असती अत्यंत लोभी जाण।
परी निर्लोभी आपण। ऐसें दाविती जनासी ॥१॥
निर्लोभ दाविती वरी वरी। लोभ धरिती अंतरीं परी।
वाढवावया आपुली थोरी। नाना युक्ति योजिती ॥२॥
कोणी ह्मणवी रामदास। कोणी ह्मणे मी हंस।
तुकारामही कोणास। अभिधा असे जाणवा ॥३॥

कोणी स्थापी संध्यामठ । कोणी करी भजनीं थाट ।
परी ते सर्व महा शठ । द्रव्यार्जनार्थ हीं ढोंगें ॥ ४ ॥
आह्मा द्रव्य नको ह्मणती । मठाकारणेंच द्यावें ह्मणती ।
स्वयें मठाचे अधिपति । ऐषआराम भोगिती ॥ ५ ॥
गुरुदक्षिणा उपदेश काळीं । मठालागीं मदत निराळी ।
मागताती वेळोवेळीं । शिष्यही देती गुरूना ॥ ६ ॥
गुरूपदेशें पुत्र होतो । गुरूपदेशें रोग जातो ।
गुरूपदेशें मोक्ष मिळतो । गुरूपदेशें धनलाभ ॥ ७ ॥
ऐसें जना तें सागती । दत्तावतार आपणां ह्मणती ।
नाना युक्तींनीं फसविती । भोळ्या भाविक जनाना ॥ ८ ॥
शिष्यागणीं नर–नारी । गुरुकृपा परी नारींवरी ।
जैशी न तैशी नरावरी । ऐसें स्पष्ट दिसतसे ॥ ९ ॥
बालविधवा पष्ट शिष्यिणी । तैशाचि कांहीं सुवासिनी ।
भोंदु गुरूचें निशिदिनीं । प्रेमें सेवा करिताती ॥ १० ॥
ज्वरें पीडिला निज पति । तयासी 'ओही' न देती ।
तांबूल द्यावया गुरूपति । त्वरा फार झाली त्यां ॥ ११ ॥
गुरूसी बदामाची खीर । पतीलागीं चिंचेचेंच सार ।
प्रेमें निरखिती वारवार । गुरुवदन चंद्रमा ॥ १२ ॥
वारा घालिती तालवृंतें । शयनीं बैसुनी तत्पदातें ।
रगडिती जाणा आपुल्या हातें । ऐशा शिष्यिणी गुरुनिष्ठ ॥१३॥
ऐशा लीला वानूं किती । नेणो गुरु कीं उपपति ।
ह्मणवुनी नारी तयाप्रति । सेविती ऐशा आनंदें ॥१४॥
सुगंध तैलें अंगा लाविती । उष्णोदकें स्नान घालिती ।
गुरूचें उच्छिष्ट भक्षिती । प्रेमें देती तांबूल ॥१५॥
अहल्या, द्रौपदी, सीता । याचा गुरु कोण होता ।

गुरु न करिता पतिव्रता । वद्य न झाल्या काय त्या ॥१६॥
पतीच गुरु स्त्रियाप्रति । ऐसें शास्त्रें सागती ।
कासया भोंदु गुरुप्रति । सेवावें हें कळे ना ॥१७॥
शिष्य जरी तांबूल देई । तरी न मिष्ट लागे काई ।
यास्तव गोभट्या शिष्यिणी बाई । तांबूल दातीं योजिती ॥१८॥
इंद्रिय–ग्राम बलवान । निराश्की ... ...

निश्चयें होतो म्हणवून । संगती न करा नारींची ॥१९॥
बालवानिंद्रिय ग्रामो । विद्वासमपि कर्षति ।
व्यासें ऐसें भागवतीं । कथिलें तें काय असत्य? ॥२०॥
एकांतीं लोकांतीं स्त्रियांशीं भाषण । करू नये प्राण गेल्या जा—
ऐसें संत शिरोभूषण । तुकारामही सांगतसे ॥२१॥
अष्टविध घडतें मैथुन । एकांत, केलि, दर्शन, स्पर्शन ।
स्त्रियाप्रति न करावें म्हणून । मनुही सांगे स्मृतिमाजी ॥२२॥
विश्वामित्र तपोधन । तैसा शृंगऋषी जाण ।
अन्यही तैसे मुनिजन । भ्रष्ट केले स्त्रियानीं ॥२३॥
घृतकुंभसमा नारी । तप्तांगारसमः पुमान् ।
तस्माद् घृतंच वन्हिंच । नैकत्र स्थापयेद्बुधः ॥२४॥
ऐशी भारतीं कथिली नीति । जे न पुरुष मनीं आणिती ।
निज पत्नी गुरु सेवेप्रति । पाठविती जाणा अधम ते ॥ २५ ॥
पतिवांचुनी अन्योच्छिष्ट । भक्षितां स्त्रिया होती भ्रष्ट ।
भोंदु गुरूचें उच्छिष्ट । नरकप्रदची होय तें ॥ २६ ॥
वेदशास्त्राचा गंधही नाहीं । संध्याही नये पाठ पाहीं ।
ऐसे भोंदु गुरु काहीं । कर्मभ्रष्ट आढळती ॥ २७ ॥
असा एक भोंदु गुरु । वंचिती जना पापतरु ।
नाहीं तयाच्या थोरथोरू । लागती कैसे कळे ना? ॥२८॥

वकील, मुनसफ, डाक्टर । ऐसेही कांहीं थोर थोर ।
भोंदु गुरूंनीं फसविले नर । मग न अज्ञ का फसती ॥ २९ ॥
ऐशा गुरूचे धरुनी कान । द्यावे दूर हांकलुन ।
खरूज भरलेलें हें श्वान । द्वारीं उभें न करावें ॥ ३० ॥

अस्तु. वरील उताऱ्यावरून आह्मी एकदर गुरुसांप्रदायाचे विरुद्ध आहों असें कित्येकास वाटेल व कित्येक आह्मास या बाबतींत नास्तिक ह्मणून विशेषणही देतील. पण आह्मीं गुरुपरंपरेचे विरुद्ध नसून फक्त भोंदु गुरूचे विरुद्ध आहों हे आमचे लिहिण्याचा नीट विचार केल्यास दिसून येईल. 'ऐसे संत झाले कळी। तोंडी तंबाकूची नळी। भांग भुर्की हें साधन। पचनीं पडे मद्यपान॥', इत्यादि वर्णन करून तुकाराम महाराजानींही भोंदु संताचा समाचार घेतला आहे. समर्थ रामदासानीं दासबोधात भोंदु गुरूसंबंधानें एक समास खर्ची घातला आहे व वामन पंडितानींही अशा गुरुबोधास 'रापतरु' असें नाव दिलें आहे, यावरून त्यावेळींसुद्धा भोंदु गुरूंचा बराच सुळसुळाट झाला होता असे दिसतें. आह्मीं वरील ओंव्यात केलेलें वर्णन काल्पनीक नसून अनेक भोंदु गुरूंच्या लीला प्रत्यक्ष पाहून केलें आहे. आता असे भोंदु गुरु कोण? असें कोणी विचारील तर आह्मास त्यांचीं नावें कायद्याचे दृष्टीनें प्रसिद्ध करतां येत नाहींत. चोरीचा धंदा करणाऱ्या मनुष्यालाही त्याच्यावर पुराव्यानें चोरीची शाबिती होऊन शिक्षा झाल्यावाचून त्यास चोर असें ह्मणतां येत नाहीं, मग या अनाचारी भोंदु साधूना आह्मीं हात धरून चवाट्यावर कसे आणणार? आतां तितका यत्न केला तर तसेंही करता येईल पण आह्मास हा उद्योग करण्यास पाहिजे तितका वेळ नाहीं यास्तव आह्मीं कांहीं भोंदूंचीं मोघम वर्णनें देत आहों. (१) सुमारें २५ वर्षांमागें रत्नागिरी जिल्ह्यांत लांजें येथें एक दत्तावतारी बुवा झाले पण हें ढोंग फार दिवस टिकलें नाहीं. (२) राजापूर तालुक्यात एका गावीं एक हरदासबुवा दत्तावतार बनले.

त्यांनीं गावाबाहेर मठ बांधला व भजनाचा अड्डा सुरू केला. बुवाचे दोन तीन पट्टशिष्य होते त्यांनीं बुवाची कीर्ति वाढविली. दत्त महाराज रात्रीं प्रत्यक्ष बुवाचे भेटीस येत! पण इतर सामान्य लोकास ते दिसत नसत; फक्त बुवा व त्यांचे पट्ट शिष्य यांसच दिसत! दत्त महाराज येतेवेळीं दिवे मालवावे लागत व महाराज आले कीं अत्तराचा वास सुटे आणि प्रसाद ह्मणून ते नाना प्रकारचीं फळें देत. मठाचे सर्व दरवाजे बंद, बाहेरून आंत येण्यासही वाव नाहीं व वरचे भागीं कडीपाट केलेला पण अशा स्थितींत दिवे मालवताच तेथें फळांचा वर्षाव होत असे! अर्थात भाविक लोकास श्रीदत्त महाराज येतात ही गोष्ट खरी वाटू लागली यांत नवल नाहीं पण पुढें या बुवानीं एका बाईचे पाच हजार रुपये उपटले तेव्हा मठाची झडती घेण्यात आली, त्यावेळीं मठातील कडीपाटास गुप्तद्वार ठेवलेलें आढळलें. बुवांचा एक चेला वर बसलेला असे व तो तें द्वार उघडून त्यांतून फळें टाकी, व द्वार बंद करी! ही गोष्ट उमगल्यावर हा अवतार संपला. बाई श्रीमंताची असल्यामुळें व दुसऱ्याच नाजूक गोष्टी बाहेर येणाऱ्या असल्यामुळें सरकार दरबारात प्रकर्ण गेलें नाहीं. (३) आमचे एक वर्गबंधु मराठी शाळेचे शिक्षक होते, त्यानीं एका गुरूचा उपदेश घेतला. गुरुदक्षिणा ह्मणून ते आपला निम्मे पगार गुरूस देत! पण बाकी राहणाऱ्या निम्मे पगारात ते, त्याची बायको व आई इतक्यांचा निर्वाह होईना ह्मणून त्यानीं गुरूच्या आज्ञेनें आईस घरातून घालवून दिलें! पुढें या गुरुबोवाची एक शिष्यीण गर्भार राहिली व गुरूंची अब्रु जाण्याचा प्रसंग आला तेव्हा या एकनिष्ठ चेल्यानें तिला आपले घरीं आणून तिचें बाळंतपण केलें! (४) १९०८–९ सालाचे सुमारास नाशीक, मुंबई, पुणें व रत्नागिरी इत्यादि ठिकाणीं एका योगिराजानीं खूप धामधूम केली. मोठे मोठे लोक चेले झाले, अनेक मठ स्थापन झाले पण योगिराजास शिष्यिणींचा समागम भोंवला व अनेक ठिकाणीं शेणमार होऊन, योगिराज

दडी देऊन बसले ! (५) एक कावळा आपण मानस सरोवरांतील हंस आहें, असें सांगून आपल्या मिष्टान्न भक्षक चोंचींत पुष्कळ स्त्री पुरुषाकडून मिष्टान्न घालून घेत आहे. या राजश्रीनें एक बडें घराणें नामशेष केलें! आमच्या एका मित्राची मुलगी याचे पाशातून मोठ्या यत्नानें सुटली. ( ६ ) काहीं वर्षांमागें एक पदवीधर महंत अवतीर्ण झाले, अर्थात याचे चेल्यांत पदवीधराचाच भरणा फार होता. पुढें या गृहस्थास श्रीमंत अशी एक शिष्यीण मिळाली. ही बाई पूर्वजन्मीं या महंतांची पत्नी होती पण या जन्मीं ती चुकून दुसऱ्याची बायको झाली होती. महाराजास हें नातें माहीत होतेंच पण त्या बाईला तें आठवत नव्हतें महंतानीं त्या नात्याची आठवण करून देताच बाईलाही पूर्वजन्मींचा संबंध आठवला! मग नवें नातें जुळण्यास उशीर कसला ! लगेच गुरू शिष्यिणींचें पतिपत्नींत रूपांतर झालें व सृष्टिनियमाप्रमाणें मुलें बाळेंही झालीं. मात्र पदवीधर शिष्यानीं शिष्यत्वाचे राजीनामे दिले एवढी गोष्ट वाईट झाली.

अस्तु. याप्रमाणें आम्हास अनेक भोंदु आढळले आहेत गुरूचे ताटांतील उच्छिष्ट प्रसाद म्हणून खाणारे शिष्य व शिष्यिणीही आम्हीं पाहिल्या आहेत. पुष्कळ भोळ्या बायका अशा गुरूचे जाळ्यात सांपडून वित्त आणि अब्रू गमावून पश्चातापात पडल्या आहेत आणि अनेक शिष्य नागावले जाऊन हाय हाय करीत बसले आहेत. तेव्हां अशा गुरूंचा निषेध करणें व या बाबतींत लोकांस सावध करणें आमचें कर्तव्य आहे. भोंदु गुरु जगांतून नष्ट होणें शक्य नाहीं. रशियाचा झार बादशहा व त्याची पत्नी हीं सुद्धा भोंदु गुरूच्या जाळ्यांत सांपडलीं होतीं. तेव्हां आमच्याच देशांत भोंदु आहेत व त्यांच्या नादीं लागणारे भोळे लोक आहेत असें समजण्याचें कारण नाहीं. भोंदु गुरूंचा उपद्रव कमी करण्याचे दोन मार्ग आहेत ते असे. लोकजागृति करून लोकांचा भोळेपणा नष्ट करणें हा एक मार्ग व भोंदु गुरूंचीं कृत्यें त्यांच्या नांवनिशीवार चवाठ्यावर आणणें हा दुसरा

मार्ग. मात्र या मार्गांत फार सावधपणा राखला पाहिजे. पुरावे खात्रीचे दिले पाहिजेत व भोंदूस कायद्याप्रमाणें शिक्षा होईल असें केलें पाहिजे. खऱ्या सत्पुरुषांनीं सुद्धा या कामीं मदत केली पाहिजे. केव्हा केव्हा शिष्य-मंडळी आपल्या गुरूची योग्यता वाढविण्यासाठीं गुरूविषयीं भलत्याच अलौकिक सामर्थ्याच्या गोष्टी सांगत असतात; पण अशा खोट्यानाट्या गोष्टी सांगून आपली कीर्ति वाढवावी असें त्यास गुरूनें सांगितलेलें नसतें. शिष्याचा हेतु गुरूची प्रतिष्ठा वाढवून तद्द्वारा आपली प्रतिष्ठा वाढविण्याचा असतो; पण या योगानें गुरूकडे मात्र दोष येतो व तो टीकेस पात्र होतो. **'ढेंकुणाचे संगे हिरा जो भंगला कुसंगें नाडला साधु तैसा'** या न्यायानें पुष्कळ सत्पुरुषास त्यांच्या भाजी चेल्यांनीं नागविलें आहे. अलौकिक सामर्थ्याचें वर्णन करण्यासही कांहीं मर्यादा ठेवावी. अगस्ति मुनी घटापासून जन्मले! त्यांनीं एका आचमनात समुद्र कोरडा केला व तें उदक मूत्र रूपानें सोडून दिलें ह्मणून समुद्राचें पाणी खारें झालें! ही पुराणकथा खरोखरच घडली होती असें ह्मटलें तर 'मृगतृष्णांभसि स्नातः खपुष्प कृतशेखरः। एष वंध्या सुतो याति शशशृंग-धनुर्धरः ॥' हें तरी खरें का मानू नये? चंद्रास कौरवाचे वाड्यातील गवाक्षांतून जावें लागत असे! मारुतीचे पुच्छास चिंध्या बांधून लंका जाळली व मग तें पुच्छ हातानीं चोळून विझविलें व हात तोंडास चोळले तेव्हांपासून वानरांचीं तोंडें व हात काळे झाले! कुंभकर्ण सहा सहा महिने इतका गाढ निजे कीं, त्याचे नाकात एकदा हजामत करीत असणाऱ्या न्हाव्याचा वस्तरा गेला ह्मणून तो शोधण्याकरिता नाकांत न्हावी गेला; तो वस्तरा शोधीत असता त्यास एक गृहस्थ तेथें भेटला! न्हाव्यानें त्या गृहस्थास तू कुठला कोण व इकडे का आलास असें विचारता तो म्हणाला मी एक गरीब शेतकरी आहें. मी आपले बारा बैल घेऊन घराकडे जात होतों

रस्त्याचे कडेला हा कुंभकर्ण बसलेला होता त्यानें श्वास घेतांच माझे बैल गाड्याबरोबर आंत ओढले गेले! ते मी शोधीत आहें आज महिनाभर शोध करीत आहें पण पत्ता नाहीं! ही हकीगत ऐकून न्हाव्यास आपला वस्तरा शोधणें व्यर्थ आहे असें वाटलें. अशा प्रकारच्या कल्पनेच्या भराऱ्या मारणारे कित्येक कवि जसे पूर्वी होते तसे हल्लींही. कांहीं कल्पक लोक सद्गुरूंचे शिष्य समुदायात असतात व ते आपल्या गुरूकडून कविसृष्टींत नाना प्रकारचे चमत्कार करवून लोकास दाखवितात!

आम्हांस नांदगावचे श्रीयुत वासुदेवराव थत्ते हे गृहस्थ एरंडोल येथें भेटले त्यांनीं आम्हास पुढील गोष्ट सांगितली. "श्रीयुत सुप्रसिद्ध दाजी आबाजी खरे ह्मणजे पक्के सुधारक पण त्यास एकानें एक चमत्कार पाहण्यास बोलाविलें व तो चमत्कार पाहिल्यापासून ते सत्पुरुषाचे भक्त बनले, तो प्रकार असा. श्री. दाजीसाहेब, मी व ते गृहस्थ नर्मदेचे काठीं एका खेडेगावीं गेलों. तेथें एका खडकात अनेक खोल्या असलेली एक भव्य इमारत होती. कोरींवलेल्याप्रमाणें तयार केलेल्या या भव्य इमारतींत छप्परपलंग, गालीचे, वाचन पुस्तकें, वर्तमानपत्रें, क्रीडा करण्याचीं साधनें वगैरे भरपूर होतीं. आम्ही तेथें जाताच आमचें स्वागत करण्यास एक गृहस्थ आले व त्यांनीं आम्हास एका खोलींत नेलें. निरनिराळ्या खोल्यांतून शेंकडों यात्रेकरू उतरलेले होतेच. आम्हीं त्या खोलींत आपलें बिऱ्हाड लावलें इतक्यात एक गृहस्थ आपण चहा, काफी, कोको, दूध वगैरे पैकीं काय घेतां असें विचारण्यासाठीं आले. त्याजवळ ज्यानें त्यानें आपापल्या इच्छित पदार्थांची मागणी केली. याप्रमाणें तपास करून ते गृहस्थ जाताच एक ब्राह्मण सर्व पदार्थ घेऊन आला व चमत्कार हा कीं त्यानें प्रत्येकाचे पुढ्यात त्याचा इच्छित पदार्थ बिनचूक ठेवला! पुढें भोजनाचे अगोदर अशीच प्रत्येकाची

आवड नावड विचारण्यात आली. शेंकडों लोकांचे इच्छा भोजनांत अर्थात विविधता होती पण चमत्कार हा कीं प्रत्येकाचे पुढ्यात त्याचे आवडीचे पदार्थांनीं भरलेलें ताट आलें! भोजनोत्तर एक गृहस्थ झटपट ताटें घेऊन गेला. हे सर्व नोकर आपलें काम झालें कीं अदृश्य होत. स्वयंपाक कोठें होतो व कोण करतो याचा आम्हीं खूप तपास केला पण आम्हास कांहीं समजलें नाहीं. पुढें सायंकाळीं एक जटाधारी दिव्य पण वृद्ध मूर्ति एका वृक्षाचे पारावर येऊन उभी राहिली. थोड्याच वेळात या मूर्तीचे सभोंवार हजारों गाई जमल्या. महाराज एकेका गाईस हाक मारीत व तीच गाय महाराजाजवळ येई. गाय जवळ येताच महाराज तिला एक पेंडीचा खडा देत व तो मिळताच ती निघून जाई, नंतर दुसरी येई. या प्रमाणें शाळेंतील मुलें बक्षीस समारंभाचे वेळीं जशीं बक्षिसें घेऊन जातात तशा सर्व गाई पेंडीचा प्रसाद घेऊन चालत्या झाल्या व बुवाही त्या पारावरून खालीं उतरताच अदृश्य झाले! मी व दाजी साहेब यानीं त्या बुवाचा व त्या गाईचा सभोंवार चार पाच मैलपर्यंत फिरून तपास केला पण आम्हास कांहीं पत्ता लागला नाहीं! आम्हीं ८ दिवस येथें होतों व हा प्रकार नित्य पहात होतों. दाजीसाहेब तर या चमत्कारानें आश्चर्यचकित झाले! हा सर्व प्रकार त्या सिद्ध पुरुषाच्या सिद्धीचा आहे असें मी दाजीसाहेबास सांगितलें व तें त्यांस पटलें; तेव्हांपासून दाजीसाहेब आस्तिक झाले."

थत्ते यानीं सांगितलेली ही गोष्ट आम्हीं आपले शब्दांत जरी लिहिली आहे तरी त्याचे सांगण्याचें स्वरूप यत्किंचितही विकृत केलें नाहीं. थत्ते यानीं ही गोष्ट सांगितली तेव्हा एरंडोलचे चीफ ऑफिसर श्री. जनुभाऊ नांदेडकर हेही जवळ होते. आम्हीं त्या ठिकाणाचे नांव विचारताच तें मी आता विसरलों असें थत्ते महाशयानीं उत्तर दिलें! थत्ते हे गृहस्थ श्रीमाधवनाथ महाराजाचे पट्ट शिष्य

असून त्यांनीं त्याचें चारित्रही लिहिलें आहे. अर्थात अशा प्रसिद्ध गृहस्थानीं ही गोष्ट आम्हास सांगितल्यामुळें ती आम्हीं श्रद्धापूर्वक ऐकली व आपणही त्या ठिकाणीं जावें असा विचार केला. पण ' त्या ठिकाणाचें नाव आपण विसरलों, असें या महाशयानीं सांगताच आमचे डोक्यात प्रकाश पडला. रावसाहेब स्वामीस विचारावें तर ते दिवंगत झाले व असे त्या ठिकाणाचें नाव विसरलें झालें, सर्व बाजार आटोपला! एवढ्या महत्वाच्या ठिकाणाचें नाव असे विसरले हें आश्चर्य म्हणावयाचें. वरील गोष्टीवरून सत्पुरुषाच्या पट्टशिष्याचें अनुमान होईल. या पट्टशिष्याचे अतः-करणात अरेबियन नाइटमध्यें सांगितलेला एक जादूचा कंदील असावा असें आमचें मत आहे. सत्पुरुषानीं अशा जादुगार शिष्याना आळा घातला पाहिजे. पण ते जर तसें करणार नाहींत तर ते खरे सत्पुरुष नसून त्यानीं हा एक द्रव्यार्जनाचा धंदाच काढला आहे असें होईल. स्त्रियांना उपदेश देण्याच बाबतीतही फार सावधपणा ठेवावा. नवरा असलेल्या स्त्रियाना त्यांचे नवऱ्याचे द्वारेंच उपदेश द्यावा. बालविधवा इत्यादिकाना शक्य तितकें करून त्यांचे सासरे, बाप, वडील दीर इत्यादिकाकडून उप-देश करवावा पण तशी सोईच नसेल तेथें एखाद्या उपदिष्ट अशा योग्य स्त्रीकडून त्यास उपदेश देववावा. सारांश ज्या योगानें स्त्रियांशीं प्रत्यक्ष संबंध न येईल अशी दक्षता ठेवावी. या योगानें खऱ्या सद्गुरूचा दर्जा वाढेल, भोंदु गुरूना आळा बसेल व स्त्रियांचीं मनें भ्रष्ट होण्याचें भय कमी होईल. पण आमचें मत सद्गुरु समजून घेणाऱ्यास पटण्याची फारशी आशा नाहीं. ' अज्ञाने तं नर न रंजयति ! ' असाच प्रकार होणार! समा-जात अश्रद्धा वाढण्यास व अनीतीचा प्रसार होण्यास भोंदु गुरु कारण होतात व खऱ्या गुरूंचे मूर्ख शिष्यही कारणीभूत होतात. सामान्य व्याव-हारिक ज्ञान देणाऱ्या शाळेंत नाव दाखल होण्यास केवळ विद्यार्थ्यानें

4

फीचे पैसे फेंकून दिले कीं भागत नाहीं. सद्वर्तनाचा दाखला द्यावा लागतो. मग पारमार्थिक ज्ञान संपादण्यास गुरूस केवळ दक्षिणा दिली कीं झालें असें असेल काय" याचा विचार करावा. आज उपदेश देणाऱ्या गुरूंनीं केवळ आपल्या फीकडे ह्मणजे गुरुदक्षिणेकडेच लक्ष ठेवलें आहे! ज्यास उपदेश द्यावयाचा त्याचें वर्तन कसें आहे, चित्तशुद्धि झाली आहे कीं नाहीं इत्यादि विचार ते कांहींच करीत नाहींत! अर्थात अशा उपदेश देणाऱ्या संस्था ह्मणजे भोळ्या लोकांस लुबाडणाऱ्या सोनेरी टोळ्याच होत असें आह्मी स्पष्ट ह्मणतों. बाजारांत नकली मोत्यांचा सुळसुळाट झाल्यामुळें खरीं मोत्यें ओळखण्यास जसें अलीकडे फार कठिण पडतें तसाच प्रकार भोंदु गुरूमुळें खऱ्या गुरूचा झाला आहे.

भोंदू गुरूंचा समाचार घेऊन झाल्यानंतर आह्मांस श्रीनारायण महाराजांचें पवित्र चरित्र लिहिण्याचा सुयोग प्राप्त झाला ही ईश्वराचीच कृपा होय. नारायण महाराजांचें दर्शन होण्यापूर्वी आह्मांस महाराजांविषयीं बऱ्याच अनुकूल प्रतिकूल गोष्टी कळल्या होत्या. पण कोणतीही गोष्ट अनुभवानें सिद्ध झाल्यावाचून खरी मानावयाची नाहीं व मत बनवावयाचें नाहीं असा आमचा स्वभाव असल्यामुळें आह्मी महाराजासंबंधानें उदासीनच राहिलों होतों. परंतु प्रत्यक्ष केडगांवास दोन खेपा करून जेव्हां तेथील सर्व व्यवस्था डोळ्यांनीं पाहिली तेव्हां महाराजांविषयीं आमचे मनांत सद्भाव प्रगट झाला व टीकाकाराच्या खोडसाळपणाची, ऐकीव गोष्टींवर कादंबरी रचण्याच्या बुद्धीची व हवेंत वगळे बांधण्याच्या कलेची आमचे मनांत कींव उत्पन्न झाली. या सर्व गोष्टींचें इष्टफळ या पुस्तक रूपानें उदय पावलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. श्रीनारायण महाराजांसंबंधानें आमचें कानांवर आलेले आक्षेप आह्मी स्पष्टपणें देत आहों व त्याविषयीं आमचें मतही निर्भीडपणें लिहीत आहों.

(१) श्री नारायण महाराज मुंबईस अंजनीकडे उतरत व हल्लीं तर

अंजनी त्याकडेच असते ! अजनी ही बाई गणिका आहे इतकें सांगितलें कीं त्यात तिचें सर्व वर्णन आलें. मग या सत्पुरुषास हें स्थळ कसें आवडले ?

(२) श्री नारायण महाराज श्रीमतास जवळ घेतात, त्यास आपले खाशा पंक्तीस घेतात, व गरिबास दूर ठेवतात ही भेददृष्टी सत्पुरुषास शोभत नाहीं.

(३) श्रीनारायण महाराज आपले पायांवर रुद्राचा अभिषेक करवून घेतात !

(४ श्रीनारायण महाराज सत्पुरुष आहेत तर त्यास ऐषआराम कशाला पाहिजेत ? ते अत्तर का लावतात ? ते बगल्यात का राहतात ? ते सरबतें का पितात ? येणें प्रमाणें महाराजां विषयीं मुख्य आक्षेप आहेत. आम्हांस आक्षेपकाचें समाधान करून यश मिळणार नाहीं. कारण बरेच आक्षेपक 'ब्रह्मापि तं नर न रंजयति' या वर्गांतले आहेत. तथापि आमचें मत स्पष्ट लिहीण्यास हरकत नाहीं, मग तें कोणास पटो कीं न पटो. पहिला आक्षेप अजनी संबंधानें आहे. अपरिचित मनुष्यास हा आक्षेप महत्वाचा वाटतो. परंतु मनुष्य स्वभावाचा पूर्ण विचार केलेल्या मनुष्यास त्यात काहींच वाटणार नाहीं. मनुष्याचें पूर्व वयातील चरित्र उत्तर वयातही तसेंच कायम राहील असा नेम नाहीं ! पूर्व वयातील निंद्याचरणाविषयीं पश्चात्ताप होऊन पुढें सुधारलेलीं व वंद्य झालेली माणसें अनेक आढळतात. वाटमाऱ्या वाल्या कोळी वाल्मीकि झाला नाहीं काय ? भागवतातील पिंगळा वेश्याच पुढें विरक्त होऊन जगद्वंद्य झाली नाहीं काय ? पुंडरीकासारखा उच्छृंखळ मनुष्य पुढें महान् भक्त झाला नाहीं काय ? सारांश इतिहासात अशीं अनेक उदाहरणें सापडतील व सध्यांही असे प्रकार घडत असलेले दिसतात. मग अंजनीस आपले पूर्व कर्मांचा पश्चात्ताप होऊन तिनें आपलें उत्तर वय ईशचिंतनात

व गुरुसेवेंत चालविण्याचें ठरविलें असल्यास तिला नारायण महाराजांनी आश्रय देण्यात गैर तें काय केलें? जिनें आपली संपत्ति सुद्धा गुरुचरणीं अर्पण केली ती अर्थरुचि तर खास नाहीं. तसेंच इंद्रिय सुखाची इच्छा करणारी असती तर मुंबई काहीं ओस पडली नाहीं! मग ती केडगावास कां आली? याचा आक्षेपकानीं विचार करावा. अजनीतारल्या वारांगना ज्याच्या दर्शनानें साध्वी बनल्या ते श्री नारायण महाराज धन्य होत असें आम्ही म्हणतों. पण अजनी सुधारली तरी महाराजाच्या दर्शनानें ज्याची कुटिल वृत्ति बदलून जे लोक सुधारत नाहींत ते श्री नारायण महाराजापेक्षा धन्य होत! अशा लोकास श्वानपुच्छाचीच उपमा शोभेल

दुसरा आक्षेप हा भोजनभाऊ लोकाचा आहे. असा आक्षेप घेणारे हे महाराजाचे दर्शनास जाणारे नसून भोजनार्थच जाणारे असतात. या भोजन भाऊंची समजूत महाराजाचे पक्वांनें भोजन चमचमीत असल्यामुळें महाराज काहीं आवडत्या श्रीमंत भक्तास आपल्या पंक्तीस घेतात, अशी आहे व आपणास या सुग्रास भोजनाचा लाभ न झाल्यामुळेंच ते चरफडत असतात व नानाप्रकारचे खोटे आरोप करण्यासही प्रवृत्त होतात. भोजनभाऊ लोकाचे मनोवृत्तीचा उत्कृष्ट मासला पाहावयाचा असेल तर गणेश विठ्ठल काटकर यानीं श्री नारायण महाराजाचें चरित्र लिहिले आहे त्यातील पृष्ठ १३ वरील पुढील मजकूर वाचा. "आतां ज्याप्रमाणें महाराजाचें दर्शन होणें कठीण पडतें, ठराविक वेळेस व तें देखील अनायासें होण्यास त्रास पडतो किंवा श्रींचें मुखकमल पोटभर पाहणें अथवा श्रीमुखातील बोधामृत निवांत रीतीनें श्रवणीं पडणें दुर्लभ झालें आहे तशी त्यावेळची स्थिति नव्हती. त्यावेळीं महाराजाचें दर्शन सदैव होत असे. आलेल्या भक्त मंडळींचे पंक्तींतच ते प्रसाद ग्रहण करीत."

वरील उताऱ्यात 'आलेल्या भक्त मंडळींचे पंक्तींतच ते प्रसाद ग्रहण करीत' हाच मजकूर मुख्य प्रतिपाद्य आहे. पण तो जरा आडवेढे

घेऊन सांगितला आहे हें चाणाक्ष वाचकाचे लक्षात येईलच. वरील मजकूर म्हणजे श्री नारायण महाराजाच्या निंदेचें पुराणच होय. वरील मजकुरावरून असें ठरतें कीं महाराज पूर्वी सामान्य स्थितींत होते तेव्हां सर्वांस भेटत व त्याची निराळी पंगत नसे. पण आतां त्यास वैभव प्राप्त झाल्यापासून ते गोरगरीबास भेटत नाहींत, त्यांच्याशीं बोलत नाहींत व सामान्य मंडळींत जेवीत नाहींत; निराळें बसून मिष्टान्न खातात! एवंच काटकरानीं महाराजास वैभवाचा ताठा आला आहे असें पर्यायानें सर्टिफिकीटच दिलें आहे म्हणावयाचें. महाराजाविषयीं काटकराचें मत जर इतकें कलुषित होतें तर त्यावेवर चरित्र लिहिण्याचा कोणी जुलूम केला होता काय!

महाराजाचें दर्शन होण्यास हल्लीं कोण त्रास होतो, असें काटकर लिहितात. पण आम्हास तसा अनुभव आला नाहीं. काटकरास हा अनुभव केव्हां आला? एकाद्या अधिकाऱ्याची भेट होण्यास जशी अर्ज करून परवानगी घ्यावी लागते, देवडीवाल्यास चिरीमिरी द्यावी लागते व परवानगी मिळाली तर भेट होते तसें बडाण्याचे बेटांत असतें तर काटकराचें लिहिणें योग्य होतें; पण तसा कांहींच प्रकार नाहीं. मग काटकरानीं अस्खलित खोटा मजकूर कसा लिहिला! याचें उत्तर महाराजाचे पंक्तीचा लाभ काटकरास न झाल्यामुळें ते संतापानें वेडे झाले हेंच आहे. महाराजानीं या भोजनभाऊंस एकदां आपले पंक्तीचा लाभ द्यावा अशी महाराजास आमची प्रार्थना आहे.

तिसऱ्या आक्षेपासंबंधानें आम्हीं एवढेंच म्हणूं कीं जर महाराजाचे पायांवर रुद्राभिषेक होत असेल तर तें योग्य नाहीं. 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः गुरुःसाक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवेनमः!' अशी गुरूची महती गायली आहे व 'यथा देवे तथा गुरौ' अशी गुरूवर श्रद्धा ठेवण्यास सांगितलें आहे. पण हीं वचनें स्तावक आहेत; केवळ वाच्यार्थ घेऊन यांचा अर्थ करता कामा नये. सद्गुरु झाले तरी ते सुद्धां कोणत्या तरी

देवाची भक्ति करीत असतातच. मग जे उपचार देवाला करावयाचे ते सर्व जर त्यांनीं आपणास करून घेतले तर देवासाठीं काय शिल्लक राहील ? आह्मी नारायण महाराज असे उपचार आपणास करून घेतात हें प्रत्यक्ष पाहिलें नाहीं. व या आक्षेपावर आमचा भरवसा बसत नाहीं. काटकरानीं श्री नारायण महाराजास 'अनंत कोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज' असें उपपद जोडलें आहे. पण आह्मीं या चरित्र ग्रंथात तें योजलें नाहीं याचें कारण वरील विवेचनावरून ध्यानात येईलच. अलीकडे पहावें तिकडे 'अनंत कोटी ब्रह्मांड नायक राजाधिराज' गुरुपदेश करीत फिरत असलेले आढळतात ! तेव्हां आता या पदवींत अर्थ राहिला नाहीं, तसेंच महाराजांस जर अनंत कोटी ब्रह्मांड नायक ह्मणावयाचें तर त्याचे उपास्य देवतेस काय ह्मणावयाचें ? एकदा शिकंदर बादशाहास तोंडपुजे लोकानीं अखिल ब्रह्मांडनायक ह्मटलें होतें तेव्हा शिकंदरानें भरती लागण्याचे सुमारास आपली खुर्ची त्या तोंडपुजे लोकाकडून समुद्र काठीं पाण्याचे कडेवर नेऊन ठेवली व तीवर आपण बसला. तोंड पुजे लोक जवळच होते. भरतीचें पाणी चढूं लागलें तेव्हा सेवक खुर्ची मागें करू लागले पण बादशाहा ह्मणाला, 'हां खबरदार! खुर्ची मागें सारू नका मी ब्रह्मांडनायक आहें.' मग तो समुद्रास ह्मणाला 'समुद्रा! मी ब्रह्मांडनायक आहें. माझी आज्ञा तुला मानलीच पाहिजे. खबरदार पुढें येशील तर !!' पण समुद्र ऐकाना. तेव्हां तो तोंडपुजे लोकास ह्मणाला, 'अहो यःकश्चित समुद्र जर माझें ऐकत नाहीं तर मीं ब्रह्मांडनायक कसा ?' वरील गोष्टीप्रमाणें महाराजानीं एकादी युक्ति करून या फाजील स्तुतिपाठकाचे कान उपटावे हेंच चांगलें.

शेवटल्या आक्षेपासंबंधानें आमचें मत या चरित्रात ठिकठिकाणीं आलेच आहे. सत्पुरुष ह्मटला कीं त्यानें लाडू जिलब्या मिळाल्या तरी त्या न खाता कदान्न खावें असा अजब शोध या आक्षेपकास लागला असावा.

झाडू जिलब्या खाणारा, बाड्यांत राहणारा, गादीवर निजणारा व अत्तर लावणारा तो साधू कसला? असें जे म्हणतात त्यास आम्ही असें विचारतों कीं शेण खाणारा, उकीरड्यावर लोळणारा व गटारातील घाण अंगास फासणारा असा प्राणी हा साधू कीं काय हें तरी सांगा. असल्या आक्षेपकांचें समाधान आमचेकडून होणार नाहीं, तेव्हा समाधान.चे भरीस न पडतां आम्हीही काहीं आक्षेप काढून आक्षेपकास संतुष्ट करितों.

(१) श्री. नारायण महाराजाचे पाय रेशमासारखे मऊ आहेत मग ते साधू कसले? (२) महाराज पायानीं चालतात व हातानीं जेवतात मग ते साधु कसले? (३) महाराज बहिर्देशेस जातात व अन्न खातात मग ते संत कसे? (४) महाराज बैलाना गवत घालतात व माणसाना भात भाकरी घालतात मग ते समदृष्टी कसे? (५) महाराज स्वतः बंगल्यावर राहतात पण मोटेचे बैलास गुराचे गोठ्यांत ठेवतात ही काय समदृष्टी? सारांश श्री. नारायण महाराज संत नाहींत हे ठरविण्यास आमचेपाशीं सुद्धा भरपूर पुरावा आहे.

---

# प्रकरण १० वें.

## उपसंहार.

सद्गुरुचा चरित्ररूपि पवित्र यज्ञ पुरा करून आज अवभृत स्नान करण्याचा विचार आहे. हा यज्ञ ईश्वरानें निर्विघ्नपणें तडीस नेला याबद्दल त्याला प्रथम शतशः प्रणाम करतों. या चरित्र यज्ञासमयानें वाचकास एवढीच विनंति आहे कीं 'अनेन प्रसविष्यध्वं एषवोस्त्विष्टकामधुक्'

मागील प्रकरणांत वढाण्याचे वेदांतील बहुतेक सर्व हकीगत आलीच आहे. कांहीं नैमित्तिक गोष्टी राहिल्या आहेत त्या येथें सांगतो. दर गुरु-वारीं श्रीदत्ताची पालखी निघते. वै शु ५ या दिवशीं येथील दत्ताची स्थापना झालेली असल्यामुळें तो दिवस वाढदिवसासारखा पाळण्यात येतो. मार्गशीर्ष शु १५ स दत्तजयंतीचा उत्सव मोठा होतो व यात्रा भरते. भाद्रपद शु १५ हा दिवस गुरुपौर्णिमा म्हणून पाळला जातो व या दिवशीं शिष्य मंडळी महाराजांचें पूजन भक्तिभावानें करितात. या दिवशीं अनेक सहस्र भोजनें होतात। यात्राही मोठी जमते. चातुर्मास्यात दर पौर्णिमेस महाराज श्री सत्यनारायणाचें थाटानें पूजन करितात. शिवाय इतर किरकोळ उत्सवही होतात. याप्रमाणें येथील नित्य दिनचर्येच्या व इतर महत्वाच्या अशा मुख्य गोष्टी आहेत.

अस्तु आतां श्री नारायण महाराजांचा परिचय करून घेणारांस एक सूचना करावीशी वाटते ती हीच कीं, महाराजांकडे चमत्कार पाहाण्याच्या इच्छेनें जाऊं नका; चमत्कार करणें व पाहणें दोन्ही प्रकार क्षुद्रच आहेत. चमत्कार दाखविण्यात संतपणा नाहीं व पाहण्यात पुण्यहि नाहीं तसेंच महा-राजांकडे वेदांतातील मायाब्रह्माची शाब्दिक बडबड ऐकण्याच्या इच्छेनेंही जाऊं नका, कारण महाराज वेदांत शास्त्री नसून स्वतः वेदांतच आहेत ते 'गुरोस्तु मौनं व्याख्यान' असें मौन व्याख्यान देतील पण तें तुम्ही जाण-लेंत तर 'शिष्यास्तु छिन्न संशयः' एवढें त्याचें सामर्थ्य आहे. शुभेच्छा, विचारणा, तनुमानसा, सत्वापत्ति, असंसक्ति, पदार्थाभाविनी व तुर्यगा अशा ज्ञानाच्या सात भूमिका आहेत; महाराज असंसक्ति भूमिकेवर असून पुढल्या भूमिकेच्या अगदीं जवळ गेलेले आहेत अर्थात, जनकादिकांप्रमाणें त्यांनीं वैभव भोगलें तरी ते इतर विषयासक्त संसारी लोकांप्रमाणें कर्मानें बद्ध होत नाहींत हें लक्षांत ठेवावें.

येथें येणाऱ्या यात्रेकरूंस व येथील व्यवस्थापक मंडळीसही एकदोन सूचना कराव्याशा वाटतात. आम्ही यात्रेकरूंचें निरीक्षण केलें त्यांत शेंकडा ९९ लोक केवळ आपल्या संसारांतील अडचणी व संकटें महाराजांच्या कृपेनें नष्ट होण्यासाठींच आलेले दिसले! पारमार्थिक बुद्धीनें येणारे विरळा! तेव्हां या लोकांनीं हें लक्षांत ठेवावें कीं महाराजांचे दर्शनानें चित्तशुद्धि करून घेणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे. तुमची चित्तशुद्धि झाली कीं, महाराजांची कृपा तुमचेवर तेव्हांच होईल व तुमचीं संकटें निवारण करण्यास महाराजांची कृपा सदैव तुमची पाठीराखी असेल. पण 'आपण श्री नारायण महाराजांस गुरु केलें आहे; आतां चोरी, दगलबाजी, विश्वासघात इत्यादि दुष्कृत्यें केलीं तरी माझी गुरुमाउली त्यांतून मला पार पाडील कारण ती दयाळू आहे!' असें भलतेंच समजून आपलें नुकसान करून घेऊं नका. 'दया तीचें नांव भूतांचें पालन आणिक निर्दलन कंटकाचें।' ही दयेची व्याख्या लक्षांत ठेवा. कंटकाचा नाश करणें ही गोष्ट दयेमध्येंच मोडते यास्तव तुम्ही कंटक व्हाल किंवा कंटकपणा न सोडाल तर महाराजांची दया तुमचेवर कोणत्या प्रकारची होईल याचा विचार करा.

चित्तशुद्धी होण्यास इंद्रिय-निग्रहाचा अभ्यास केला पाहिजे. बढाण्याचे बेटांतील साधा प्रसाद सेवन करून संतुष्ट राहण्याचा पहिला धडा जिभेस शिकविला पाहिजे. पण ही वृत्ती येथील यात्रेकरूंत दिसत नाहीं. अनेक लोक चढण्या कोशिंबिरी करण्यांत गढून गेलेले आढळतात! जिव्हेचे चोचले चार दोन दिवसही पुरे केल्यावांचून ज्यास चैन पडत नाहीं त्यास परमार्थाचा लाभ कितपत करून घेतां येईल हें दिसतेंच आहे. यात्रेकरू आपले पैसे खर्च करून चढण्या कोशिंबिरी करतात मग त्यात तुम्हास वावगें काय दिसलें असेंही एखादा चढणी भक्त आम्हास विचारील. पण यात काहीं वावगें नसेल तर उद्या कोणी कायाची मर्जी करून ती पक्वांन्न घेऊन बसूं लागेल व दुसरा लाडू जिलब्या घेऊन बसेल. पण

आमचे मतें ही गोष्ट गैरशिस्त आहे. त्यांचें जिव्हालौल्य अनावर आहे त्यांनीं धर्मशाळेंत सर्वांबरोबर न जेवता निराळा स्वयंपाक करून निराळेंच जेवावें. कित्येक यात्रेकरूंत भाऊबंदकीची क्षुद्र वृत्ति दिसून आली. त्याचा एक नमुना सांगतों. 'एका गृहस्थानें आपले बैठकी समोंवारचा केर काढून जवळच कडेस गोळा केला होता. दुसऱ्या गृहस्थाची बैठक त्याचे शेजारींच होती. त्या गृहस्थाचे मुलीनें आपले बैठकीचा केर काढला व तो भरून टाकते वेळीं ती आपले शेजाऱ्याचे बैठकीजवळ साठवून ठेवलेला केर भरू लागली. पण तिचे शहाणे आईबाप ह्मणाले, ' अग तो केर आपला नव्हे ! पाहिजे तर त्याचा तो भरील, आह्मीं काय त्याचे नोकर आहोंत कीं काय ! ' कांहीं वेळानें वारा आला व तोच केर या शहाण्या गृहस्थाच्या बैठकीवर अनायासेंच येऊन पडला. शेजाऱ्याचा केर भरण्यास आपण त्यांचे नोकर नाहीं असें ह्मणणारे हे शहाणे गृहस्थ या धर्म शाळेंत आपल्या चार माणसांसह फुकटचें जेवण झोडीत दोन महिनें पडलेले होते हें लक्षात ठेवलें पाहिजे. सारांश या क्षेत्रात तरी असली क्षुद्र बुद्धि यात्रेकरूनीं सोडावी

येथील व्यवस्थापक व सेक्रेटरी मंडळीस सूचना करण्यासारखें असें विशेष कांहीं नाहीं पण भविष्यकाळ मनांत आणून एक सावधागिरीची सूचना द्यावीसें वाटतें ती हीच कीं या नवद्वीपांत चहापानगृह स्थापिलें जाऊं नये. तसेंच येथें एक लहानसें वाचनगृह असावें व त्यात विशेषतः पौराणिक, धार्मिक व वेदांताचे ग्रंथ असावे. नाटकें—कादंबऱ्या त्यात मुळींच नसाव्या. आणखीं एक प्रेमाची विनंति आहे ती अशी कीं येथें कांहीं प्रार्थनेचे श्लोक ह्मटले जातात त्यात जुन्या श्लोकातील तीन चरण कायम ठेऊन चौथा चरण मात्र बदलण्यांत आलेला दिसतो; उदाहरणार्थ ' सदा सर्वदा योग तुझा घडावा। ' या श्लोकातील चौथा चरण बदलून त्या जागीं ' नारायणा मागणें हेंचि आतां। ' अशी योजना केली आहे !

'पहिला चरण बदलून हा नवीन चरण घातल्यानें वृत्तभंग दोष काव्य-शास्त्रदृष्टीनें झालेला दिसत आहेच. पण दुसऱ्याची कृति त्याचे परवानगी-वांचून बदलल्यामुळें ती शास्त्र दृष्ट्याही वृत्त-भंग दोष होतो! वास्तव प्रार्थनेचे इष्ट श्लोक अजीबात नवीन करावे. पूर्वीच्या कवींची कृति विकृत करूं नये.

श्री. नारायण महाराजा विषयीं अनन्य दृष्ट अशा पुढील गोष्टी सांगण्यासारख्या आहेत.

(१) महाराज स्वतः दत्त भक्त आहेत; पण आपल्या शिष्यांनीं दत्ताचीच उपासना केली पाहिजे असा त्यांचा आग्रह नाहीं। यावरून 'उपासकानां कामार्थं ब्रह्मणोरूप कल्पना।' हें तत्व महाराजाचे ठिकाणीं बिंबलेलें दिसतें.

(२) श्री नारायण महाराजाचा विशिष्ट सांप्रदाय नाहीं. अर्थात सांप्रदायाचा दुरभिमान त्याचे ठिकाणीं असणें शक्य नाहीं.

श्री नारायण महाराज सांप्रदायी गुरूप्रमाणें कोणाचे कान फुंकीत नाहींत. 'सहज बोलणें हाची उपदेश' अशी त्यांची उपदेशाची रीत आहे. अर्थात 'वस्त्र घेऊनी डोकीवरती। मुख लाउनी कर्णां प्रती। शिष्यिणीशी उपदेशिती।' असले प्रकार येथें कधींच घडत नाहींत.

(४) महाराजाचे दर्शनास स्त्रियाही येतात पण उपदेश देण्याचा सांप्रदायच नसल्यामुळें महाराजाचा त्यांच्याशीं संबंध एकांतात असा कधींच येत नाहीं. कोणत्याही स्त्रीकडे ते मातृभावानेंच पाहतात.

(५) महाराजाची वृत्ति एकाद्या बालकाप्रमाणें दिसते चेहऱ्यावर नेहमीं सात्विक आनंद झळकत असतो व आबालवृद्धांशीं सारखेंच वर्तन असतें.

(६) महाराज आधिव्याधिग्रस्तास दुःखमुक्तीचे उपाय सांगतात त्यात विविधता असते. कोणास ब्रह्मयाती करण्यास सांगतात; कोणास गायत्री मंत्राचें पुरश्चरण करण्यास सांगतात, कोणास गुरुचरित्र वाचण्यास

सांगतात, कोणास इष्टदेवतेचा जप करण्यास सांगतात तर कोणास काहीं वैदिक मंत्राचे प्रयोग सांगतात. सारांश 'अधिकार तैसा करूं उपदेश' ही गोष्ट येथें दिसते.

(७) महाराजांची वृत्ति अगदीं अयाचित आहे. कोणी द्रव्य दक्षिणा दिली तर ते ती प्रसाद म्हणून त्याचे पदरांत परत टाकतात! मात्र त्यानें तें द्रव्य या संस्थानांत जमा झालेंच पाहिजे असा आग्रह करून जमा करण्यास दिलें तर तें ठेऊन घेतात.

(८) सर्वसाधारण यात्रेकरू दर्शनाचे वेळीं नारळ, कापूर, उदबत्ती व खडीसाखर इतकें घेऊन जातो. पैकीं नारळ प्रसाद म्हणून त्याला परत येतोच.

अस्तु. या प्रमाणें श्री नारायण महाराजांचा वाचकास परिचय करून दिला आहे. या परिचयानें महाराजांचें अंतःस्वरूप पाहण्याची त्यास दृष्टी प्राप्त झाली तर मी कृतार्थ होईन. आता देवाचें दर्शन घेतेवेळीं देवाचे अंगावरील अलंकाराचेंहि दर्शन होतें. भक्त हे देवाचे अलंकारच होत. श्रीनारायण महाराजांचे एकनिष्ठ भक्त पुष्कळच आहेत. पैकीं कै. विद्वद्वर्य कृष्णशास्त्री उप्पिन बेटगेरी हे एक आमचे स्नेही होते. हल्लीं श्रीमंत डॉ. गंगाधरराव कामटीकर, श्रीमंत बाळासाहेब राजेबहाद्दर व महाराजांचे चुलत बंधु श्रीयुत गोविंदराव ऊर्फ तमण्णा ही सर्व मंडळी महाराजांचे शिष्य वर्गांत प्रमुख आहे. या सर्व मंडळींसह श्रीनारायण महाराजांस वंदन करून 'यदक्षर पदभ्रष्ट' इत्यादि झालेल्या सर्व दोषांची क्षमा करून प्रसाद व्हावा अशी विज्ञापना करितों.

RLLBK-0003598

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३५८८